# ॥ चैतन्य लहरी ॥



सन १९९४-९५ अंक क्र. ९ व १०

P. B. KALE PUNE 44

# श्री योगेश्वर पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मलादेवी भाषण

## न्यू जर्सी, अमेरिका २-१०-९४

आज आपण श्रीकृष्णाची योगेश्वर म्हणून पूजा करणार आहोत. विष्णूचा पहिला मानवी स्वरूपाचा अवतार म्हणजे वामन - अवतार; कालांतराने श्रीराम आले, म्हणजे श्रीकृष्णाचा पूर्वजन्म म्हणजे श्रीराम होता. श्रीरामांनी त्यांच्या काळी वनवास पत्करून खूप कष्ट केले. त्यांच्या पत्नीचे - सीतेचे - अपहरण झाले आणि तिला परत आणून कल्याणकारी राज्य या पृथ्वीवर निर्माण करण्यासाठी अयोध्येचे राजपद त्यांनी भूषवले. पण आयुष्यभर कष्ट, ताप हेच त्यांच्या वाट्याला आले. त्यामुळे श्रीरामाचे भक्त फार कष्टप्रद जीवन जगले. श्रीराम खूप वर्ष दर्भासनावर झोपले तसेच हे भक्त पण गवतावर झोपत, पायात लाकडी खडावा घालत, अगदी कमी कपडे वापरत किंवा पत्नी नसताना श्रीराम घालत तसे नुसते एक धोतर नेसायचे. पत्नी जवळ नसताना श्रीरामाने आयुष्यांत कसलाही उपभोग घेतला नाही आणि तिचे अपहरण झाल्यावर तर ते तपस्व्यासारखे रहात. हे सर्व एक आदर्श माणूस, पती म्हणून कसा असावा हे दाखविण्यासाठी झाले. ते एकपत्नीव्रत धारण करून होते. सीता ही देवता आहे, साक्षात महालक्ष्मी आहे हे माहीत असूनही त्यांनी जे कराव लागलं ते कल्याणकारी राजा कसा असावा हे दाखविण्याकरता केले.

श्रीकृष्णाचा अवतार घेऊन विष्णूंनी या खडतर जीवनाचे परिणाम नाहीसे केले. बालपणी त्यांनी खूप संकटांना तोंड दिले आणि त्यातून पार पडून पुढे आपल्या मामाचा, कंस, जो राक्षस होता त्याचा वध केला. मग ते द्वारकेला गेले आणि तिथे नवीन नगर बनवून द्वारकाधीश झाले. सहजयोगात श्रीकृष्णाला जाणणं हे फार सूक्ष्म आहे. तो लीलाधर आहे. ह्या विश्वाला तो एक नाटक म्हणायचा, म्हणजेच तुम्ही एक साक्षी बनलं पाहिजे. तुमचं मनसुध्दा साक्षी व्हायला हवं असं म्हणायचा. विराट - स्थितीमध्ये ते अकबर असतात, ज्यावेळी ते आदिशक्तीचे मन व बुध्दी बनतात. म्हणून ते प्रथमच सांगतात की आपण या जगाच्या नाटकाचे प्रथम साक्षी बनलं पाहिजे आणि मायेच्या भ्रमामध्ये हरवून जाऊ नका. साक्षीभावामध्येच तुम्हाला माया आणि तिचा प्रभाव समजेल. म्हणून श्रीकृष्णाचं पहिलं सूक्ष्म कार्य हे लीला दाखवण्याच आणि त्यामधून श्रीरामाच्या आवतारकाळात जीवनाला आलेला खडतरपणा कमी करण्याचं. त्यांचा दुसरा गुण म्हणजे लोकांना माये - मधे न्यायचं. ते जर बुध्दी आहेत तर आपली बुध्दीसुध्दा साक्षीरुप झाली पाहिजे आणि त्यातुन जगाकडे नाटक म्हणून बघितलं पाहिजे, मग कुठल्याही घटनेकडे फार गंभीरपणाने लक्ष देऊ नये. जगातील घटनांकडे एक नाटक म्हणून साक्षीभावाने पाहताना आपण नेपोलियन आहोत किंवा नाटकात काम करीत अहोत असं तुम्हाला प्रथम वाटेल. पण नंतर ते नाटक संपल्यावर हे नाटक होतं असं तुम्ही जाणाल. या स्थितीला येण्याकरता तुम्ही फार फार जागरुक व्हायला हवं. कारण आपण प्रत्येक गोष्टीचा बुध्दीतून विचार करतो. आणि ही बुध्दीच विचार, आणखी विचार करायला लागून माया तयार करते आणि

त्यातच अडकून बसते.

तर तुम्हा सर्वांना आत्मसाक्षात्कार झाला आहे म्हणून तुम्ही या मायेच्या पलीकडे पाहू शकता.तुमच्यामध्ये श्रीकृष्णाची बुध्दी प्रतीबिंबित झाली असेल तर मी काय करते व तुम्ही काय करता हे तुम्हाला बरोबर समजेल. तुमच्या डोक्यात कसलीही काळजी असायला नको, कसले प्रश्न नकोत आणि कसलाही तणाव नको कारण तुम्ही सारं काही निर्विचार चेतनावस्थेतून पहात असता. तुम्ही अशा निर्विचार जागृतावस्थेत असता तेव्हां तुमची बुध्दी फक्त साक्षीभावात असते तेव्हाच तुम्हाला परमेश्वरी कार्य कसं चालते हे समजेल. उदा. मी गाडीमध्ये बसले तेव्हा त्यांना कुठं जायचं माहीत नव्हतं आणि ते चुकीच्या रस्त्याला लागल्यावर मी त्यांना सांगीतलं. त्याला आश्चर्य वाटलं की माताजींना हे कसं कळलं ? पण मला चैतन्यलहरीतून तुम्ही इकडे जमला आहात हे समजलं. निर्विचार अवस्थेत पण जागृत असल्याशिवाय तुम्हाला परम सत्य समजू शकत नाही. तुमच्या बुध्दीमधूनच तुम्हाला ते कळेल. तुम्हाला कुठं हात लावायची वा प्रश्न करण्याची जरूर नाही कारण हे सर्व एखाद्या कॉम्प्यूटर सारखं चालते आणि तुम्हाला उत्तरं मिळतात. त्यावेळी तुम्ही परम चैतन्याशी एकरूप झालेले असता. प्रत्येक गोष्ट, प्रत्येक क्षण श्रीकृष्णाने जाणलेला व नोंदलेला असतोच पण त्याचवेळी ते आपली परिक्षा घेत असतात. ते फार कुशल असल्यामुळे तुमच्याशी लीला खेळत असतात.

ते तुमच्याशी कशी लीला खेळतात हे पाहणं फार मजेशीर आहे. उदा. त्यांनी अर्जुनाला सांगीतलं की 'मी युध्द करणार नाही पण तुझ्या रथाचा सारथी होईन'. हे वरवर पाहिलं तर कुणालाही विचित्र वाटेल पण यातूनही ते अर्जुनाल, जो भविष्यांतील घटना आपण जाणतो असं समजत होता, एक माया दाखवतात. अर्जुनाला वाटत होतं की आपण आपल्याच सग्या-सोयऱ्यांशी आणि वडीलधाऱ्या नातलगांशी युध्द करू शकणार नाही म्हणून श्रीकृष्णाला सारथ्य करून गीता सांगावी लागली. तुम्ही जर असं समजला की गीता हा शांततेचा संदेश आहे तर ते चुकीचं होईल. ते म्हणतात की हे सर्व लोक अगोदरच मेले आहेत तर मग तू कोण त्यांना ठार करणारा ? आणि युध्द न करतां तू रणांगणातून पळून गेलास तर लोक तुला भ्याड म्हणतील, मग तुला काय मिळणार ? पण जर तू तुझ्या क्षत्रिय धर्मानुसार लढलास तर तुझाच उध्दार होणार आहे. ही फार मोठी किमया होती, मोहम्मद साहेब, ख्रिश्चन लोक आणि हिंदू लोकही तसंच म्हणतात. त्या सर्वांनाच वाटत असतं की ते आपापल्या धर्माकरता लढत आहेत. आता अर्जुनाच्या बाबतीत तो एका राक्षसी अधर्मी प्रवृत्तवरोबर लढणार होता असं म्हणता येईल पण हे लोक जेव्हा धर्माकरता प्राण द्यायला तयार असल्याच म्हणतात त्याला कसं समजायचं ? बोस्नियामधील एका मुसलमानाला मी म्हणाले की तुम्ही जर निर्गुण ईश्वर मानता तर भूमीबद्दल कां भांडतां ? तर तो म्हणाला "धर्मयुध्दात जो मारला जातो त्याला मोक्ष मिळतो असं कुराणात सांगीतलं आहे". श्रीकृष्णांनी तेच सांगीतलं. मग कुठे चुकले ? चूक हीच की "धर्म म्हणजे काय ?" तुम्ही धार्मिक आहात कां ? शिवाय त्या काळी युध्द म्हणजे शस्त्रांचा वापर, मग श्रीकृष्णांनी आपल्या हातात शस्त्र धारण करणे का नाकारले ?

पहिली गोष्ट म्हणजे लोक स्वतःला ख्रिश्चन, मुसलमान, हिंदु वगैरे म्हणत असले तरी त्यांना धर्म नसतो, धर्माच ते पालन करत नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे ते एकमेकांना ठार मारण्याच्या मागे लागलेत. प्रत्येकाला वाटतंय की आपणच बरोबर, आपण जे करत आहोत त्यात काही चूक नाही. आपल्या धर्माकरता प्राण द्यायला तयार व्हा हीच मुळी पहिली अट, म्हणजे तुम्ही धर्मासाठी भांडत आहात ! पण श्रीकृष्णाच सर्वच वेगळे, त्यांनी लगाम हाती घेतले. पण श्रीकृष्ण हे विराट आहेत म्हणजे विश्वमनच आहेत. त्यांना शस्त्रांची काय गरज ? त्यांचं मन एक महान ज्ञान. अर्जुनाला प्रत्यक्ष रणभूमीवरच, जिथे सर्व वीर युध्दासाठी सज्ज होऊन आले होते,, देण्यासाठी उत्सुक होतं. ते अर्जुनाला अगदी शांतपणे सांगू लागले. पहिल्या अध्यायातच आत्मज्ञानी पुरुषांच म्हणजे जो

स्थितप्रज्ञ असतो, लक्षणं सांगीतली. धंदेवाला माणूस, एक रुपयातून सुरुवात करून शंभर रुपयांपर्यंत येतो पण श्रीकृष्णांनी बरोबर उलट केलं. ते प्रथमच म्हणाले की स्थितप्रज्ञ झाल्याशिवाय इतर सर्व व्यर्थ आहे, त्याशिवाय तुम्ही धर्म मिळवू शकत नाही. श्रीकृष्ण समजण्यासाठी तुमची बुध्दी खूप सूक्ष्म व तीव्र हवी.

त्यांनी अर्जुनाला सांगीतलं की हा तुझा गर्भगळीतपणा टाकून दे, शस्त्र उचल आणि युध्द कर. ते म्हणाले "तू मला सांगतोस की तुला निष्क्रिय व्हायचंय् म्हणजे कर्म नको; तुझी कर्मच अकर्म होतील मग युध्द कशाला ? युध्द म्हणजे कर्मच". तर मग त्यांनी समजावलं की धर्मासाठीच हे युध्द आहे. हे खरं म्हणजे फार सूक्ष्म आहे. तुम्ही धर्मात आहांत कां ? नाही. मग कुठल्या धर्मासाठी भांडणार ? दुसरी गोष्ट कर्म. त्यांची बुध्दी चलाख असल्यामुळे त्यांनी अर्जुनाला जादु केल्यासारखं समजावलं की "तू कर्म करतोस आणि स्थितप्रज्ञ पण आहेस तेव्हां कर्माची सर्व फळे ईश्वराच्या चरणाशी अर्पण कर. सर्व धर्म सोडून दे आणि मला शरण ये". आता धर्म म्हणजे काय ? अडचण ही की लोक कृष्णाला समजू शकत नाहीत. हे सर्व ज्ञान श्रीकृष्णामध्ये आणि त्यांच्या अवतार-कार्यामधे सामावलेलं आहे. म्हणून ते म्हणतात "कर्म करत रहा पण ती सर्व कर्म ईश्वरचरणी समर्पण करा". स्थिप्रज्ञता मिळविल्याशिवाय हे होणं शक्य नाही, आत्मसाक्षात्काराशिवाय हे होणार नाही, तुम्ही आत्मसाक्षात्कारी झाल्यावर एकाद्याला जागृती देतां तेव्हां "मी जागृती देत आहे" असं न म्हणता "हे सर्व घटित होत आहे" असं म्हणतां. म्हणजे हा "मी" नाहीसा झाला की मगच तुम्ही सर्व ईश्वरार्पण करू शकाल. प्रथम हाच धर्म झाला पाहिजे. आतां कुणी एकाने खून केला आणि ते कर्म म्हणून श्रीकृष्णाच्या चरणी अर्पण केले ! तर ते म्हणाले "हे धर्म म्हणून केलं पाहिजे". पहिल्या प्रथम तुम्ही स्थितप्रज्ञ बनलं पाहिजे. मग तुम्ही जे काय कराल ते आपोआप ईश्वराच्या चरणी पोहोचेल, ताबडतोब आणि सहज.

आतां भक्तीबद्दल बोलू. ही तिसरी गोष्ट पण जरूर आहे. परमेश्वराच्या भक्तीपासून काय मिळतं ? इथेही श्रीकृष्णाची जादू चालते. एकाच शब्दाने सर्वांना मोहित करतात, म्हणतात " भक्ती करत असाल तर ती अनन्य हवी". म्हणजे तुम्ही माझ्याशी एकरूप व्हा, म्हणजेच तुम्ही स्थितप्रज्ञ आहात, म्हणजेच तुम्ही साक्षात्कारी आहात. हा एकच शब्द जर लोकांना नीट समजला तर ते भक्तीचे हे फालतू प्रकार बंद करतील आणि अनन्य भक्तीतून परमतत्वाशी योग पावतील. हीच खरी भक्ती, श्रीकृष्णांना मानवी स्वभाव चांगला माहीत होता म्हणून त्यांनी ही गोम ओळखून चलाखी केली, मानव प्राणी एरवी सहजासहजी ऐकणार नाही. म्हणून ही गोष्ट सांगून त्यांना उद्युक्त केले आणि जास्तीत जास्त भक्ती करण्याची प्रेरणा दिली.

आत्साक्षात्कार होण्यासाठी तुम्ही प्रथम आत्मा बनलं पाहिजे असं त्यांनी सांगीतलं. हे कसं होणार, कसं घटित होणार वगैरे त्यांनी त्यावेळी स्पष्ट केलं नाही. तुम्हालाही कॉलेजमध्ये गेल्यावर पहिल्या वर्षीच सगळं ज्ञान मिळते कां ? काही दुसऱ्या, मग तिसऱ्या वर्षी. गीतेमधून सांगीतलेलं सर्व ज्ञान हे सर्व माणसांना श्रीकृष्णाने फार खुबीने सांगीतलं कारण माणसांच्या अज्ञानामुळे ते सहजयोगाबद्दल बोलले असते तर ते त्यांना कधीच समू शकले नसते. आजही मला तसे अनेक जण भेटतात. पण कुंडलिनीबद्दल ऐकून घेणारे आजच्या इतके लोक एवढ्या संख्येने मिळाले नसते. इतर अवतारांचही असंच झालं, त्यांच्याजवळ जे शिष्य होते, जो समाज त्यावेळी होता तो इतक्या उन्नत स्थितीला नव्हता की कुंडलिनीच्या जागरणाबद्दल त्यांना सर्व काही सांगता येईल. त्यावेळी लोक इतके उत्क्रांत नव्हते आणि त्यांच्या मेंदूची वाढ पण कमी होती.

या कलियुगामधे जेव्हां मी हे कार्य सुरू केलं तेव्हां मला आढळून आलं की माणसांचे मेंदू फारच वाढलेले आहेत, इतके की ते मूर्खपणा करू लागले आहेत. त्यांना हे सर्व सूक्ष्मातील ज्ञान कसं सांगणार ? जर श्रीकृष्णाच्या भाषेतून सांगीतलं तर माझे व तुमचेही श्रम वाया जाणार.

तुमच्यातील निम्मे तर झोपूनच जातील. म्हणून मी म्हटलं की प्रथम तुमचा परमशक्तीशी योग करून दिला पाहिजे. त्यांना असा थोडासाही संबंध आला तरी त्यामुळे त्यांची बुध्दी प्रकाशित होऊन ते समजू शकतील, मग त्यांना उमजेल की आजपर्यंत आपल्याला जे माहीत होतं त्यांच्यापलिकडे आणखी काही मिळवण्यासारखं आहे अशा तऱ्हेने हे सर्व कार्यान्वित होणार आहे, श्रीकृष्णांच्या सूक्ष्म व जादू केल्यासारख्या लिलांमुळे एक खूप व निश्चित परिणाम झाला आहे आणि लोक समजू लागले आहेत की आजपर्यंत काहीतरी चुकत होते. इस्लाम पण बघा, इस्लाम म्हणजे शरणागती पण ही शरणागती कुणापुढे ? मुल्लांकडे ! का ? ही वारसदारी सुरु झाल्यामुळे हे प्रश्न निर्माण झाले. रियादमधे पाच वेळा पूजा करण्याचा नियम आहे व तसं केलं नाही तर बायकांना मारतात. प्रत्येक दुकान पण पांच वेळा बंद करावं लागते. मी म्हणते हे सर्व लोक मुळी खोटारडे व दिखाऊ आहेत, आता ध्यानसुध्दा पांच-पांच वेळा करायला सांगतात. मग ते ध्यान भितीपोटीच होणार. भितीमुळे कुठलीही गोष्ट करण्यांत काय फायदा ?

मोहम्मद साहेबांनी किंवा ख्रिस्तांनी जे सांगीतले ते संतमंडळींनाच उद्देशून होते, सामान्य माणसाकरीता नव्हते. आता असे देवलोक कुठे मिळणार ? फारच थोडे. पण आता जन्मतःच साक्षात्कारी असलेले लोक आहेत, ते या पृथ्वीवर यक्ष म्हणूनच जन्माला आले आहेत आणि त्यांना जे करू नये असं सांगीतले ती गोष्ट ते कधीच करणार नाहीत. त्या बहुतेकांना काय योग्य वा अयोग्य आहे याची जाण आहे. पूर्वीचे यक्ष लोक वेडे समजतात. कुणाचा विश्वास बसणार नाही पण या यक्ष-लोकांनाच समजणार. म्हणून इतर सामान्य लोकांकरीता श्रीकृष्णाने चतुराई वापरली. पुष्कळ लोक येऊन मला सांगतात "आम्ही कृष्णाचा जप करतो". त्यांना तरी काही प्राप्त झालं नाही. म्हणून ते म्हणाले की प्रथम तुम्ही स्थितप्रज्ञ व्हायला हवं. स्थित म्हणजे प्रस्थापित आणि प्रज्ञ म्हणजे साक्षात्कारी. तुमचे व्यक्तिमत्व प्रकाशित व पूर्णपणे प्रस्थापित व्हायला हवं. नंतर त्यांनी इतर खूप काही सांगीतलं आणि म्हणून लोकांनी त्याचा चुकीचा अर्थ लावला. पण श्रीकृष्णाची पध्दत अशी होती की ते एका जन्मात समजू शकणार नाहीत, दुसऱ्या जन्मातही नाही पण तिसऱ्या जन्मात ते विचार करायला लागतील की हे सर्व काय आहे ? म्हणून प्रथम स्थितप्रज्ञ होणे व नंतर आपलं काय चुकलं असा विचार येऊन आत्मपरीक्षण करणे. हीच श्रीकृष्णांची लीला.

गीतेवर तासन् तास व्याख्यान देणारे लोक मी बघितले पण त्यांचे मेंदू पार बंद झाले आहेत. श्रीकृष्ण कुंडलिनीबद्दल काहींच बोलले नाहीत पण ज्ञानेश्वरांनी आपल्या गुरुंची (वडील भावाची) परवानगी मागीतली की मला कुंडलिनी बद्दल बोलू द्यावे आणि मग त्यांनी त्याबद्दल थोडं सांगीतले. अर्थात त्याआधी पण सहाव्या शतकामध्ये आदि शंकराचार्यांनी व त्याआधी मार्कंडेयस्वामींनी हे कार्य केलं पण त्यांनी कुंडलिनी म्हणजे काय एवढंच सांगीतलं, तिची महती सांगीतली. पण सहा चक्र पार करून ती कशी वर येते वगैरेबद्दल नाही. इतरही पुष्कळ लिहिलं गेलं पण प्रथम जर कोणी सहजयोग्याच सविस्तर वर्णन केलं असेल तर ते ज्ञानेश्वरांनी आपल्या "पसायदान" या काव्यातून. त्यांत त्यांनी भविष्यकाळी काय घटित होणार आहे हे सांगीतले. पुष्कळ लोकांना साक्षात्कार होणार आहे हे सांगून ते म्हणाले की तुम्ही (सहजयोगी) सर्वजण वरदायी अशा कल्पतरूंच्या वनाएवढे आहात तर दुसऱ्यांना हे ज्ञान देण्याच्या कामाला लागा, तुम्ही सागर आहात. त्यांनी तुमचं वर्णनही इतकं सुंदर केलं आहे की ते वाचून, त्यांचे भाषांतर वाचून, तुम्ही खरे कोण आहात ते तुम्हाला कळेल. त्यांनी सांगीतलं "तुम्ही आता सारे लागे-बांधे विसराल आणि सहजयोगी हेच नातं उरेल. त्यांच्याबरोबरच नातंच खरं. एवढं म्हणणारे आणि भविष्यकाळाची जाण असणारे म्हणजे ते खरंच अवतारी-पुरुषच असणार. सहाव्या आध्यायात त्यांनी लिहून ठेवलंय की तुम्ही साक्षात्कार मिळवू शकता. कुंडलिनी आणि तिच्या जागरणाबद्दलही लिहिलय. कालान्तराने हे सर्व प्रगट होऊ लागले आणि लोकांची आध्यात्मिक उन्नती होऊन त्यांना ते समजू लागलं. मी जर हाच सहजयोग शंभर वर्षांपूर्वी

सांगायला लागले असते तर तो घेणारा एकही शिष्य मिळाला नसता. कारण त्या काळी सर्वसाधारण लोक सुखी-समाधानी होते, त्यांचं जीवन शांत व सुरळीत होते.

पण सध्या सगळीकडे मानव प्राणी या कलियुगामध्ये अशांत, त्रस्त, दुःखी व भांबावलेला आहे. हे घोर कलियुग आहे, काय करावं लोकांना समजेनासं झालं आहे, भविष्याची त्यांना भिती व चिंता लागली आहे, या सर्वांतून काय मिळणार हा त्यांच्यापुढे प्रश्न आहे. जीवनाच हे विदारक रूप त्यांना दिसत आहे आणि म्हणून ते विचार करू लागले आहेत - मी हे काय केलं ? मी काय करत आहे ? हे असं कसं झालं ? सगळीकडे असा गोंधळ कां ? आता काय बाकी आहे वगैरे - आणि मग त्यांचा शोध (साधना) सुरु झाला आणि त्यातूनच त्यांना साक्षात्कार मिळाला. तुमच्यामधे ही शोधण्याची इच्छा नसली तर मी सहजयोगाबद्दल तुमच्याशी बोलूच शकले नसते. अमेरिकेत हे घटित झालं म्हणून मी फार समाधानी आहे.

श्रीकृष्णांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते "गोचर" आहेत म्हणजे ते आकाशतत्वातून आले आणि ते प्रत्येक वस्तुमागच्या अंतरंगात पोचू शकतात; अणू-रेणू-परमाणूच्याही आत जाऊ शकतात. सर्व शास्त्रज्ञ मानतात की अणूमध्येसुध्दा समान व असमान लहरी असतात आणि ते या सर्वांच्या अंतरंगात शिरू शकत असल्यामुळे ते सर्व काही व्यापून राहतात - प्रत्येक वस्तु, प्राणी, मानव, साक्षात्कारी लोक इ. सर्व वस्तुमात्रांत ते असतात. पदार्थामध्ये ते चैतन्यरूप तर प्राण्यांमध्ये प्रेरकशक्ती म्हणून ते आहेत. सैबेरियापासून पक्षी ऑस्ट्रेलियात बरोबर पोचू शकतात; त्यांना दिशेच ज्ञान कसं येते ? आपण एरवी याचा विचार करत नाही. तीच गोष्ट जनावरांची, त्यांना काही गोष्टी बरोबर समजतात. उदा. जंगलातील वाघ, सर्व प्राणी वाघाला ओळखतात. जंगलातील त्यांच वास्तव्य त्यांना ओळखता येते आणि ते सर्वजण शांतपणे त्याचा अधिकार मानतात. तो फक्त एकच जनावर मारतो, इतर प्राणी ते जाणतात आणि मान्य करतात, त्या मेलेल्या पशूला एक दिवस कुणीही हात लावत नाही, हा प्रोटोकॉल लक्षात घ्या. दुसऱ्या दिवशी येऊन तो मनसोक्तक्त भक्षण करतो, मग त्याची मादी व शेवटी त्यांची पिल्ले खातात; नंतर इतर जनावरे क्रमाक्रमाने, आपापल्या अधिकाराप्रमाणे खातात व सर्वांत शेवटी कावळे. ह्या प्रोटोकॉलमुळे प्राण्यांना उपदेश मिळतो आणि त्यांचा स्वभाव टिकून राहतो. ते मनुष्यप्राण्यांसारखे नसतात; साप हा सापच आणि वाघ हा वाघच राहतो. मनुष्यप्राणी मात्र कधी साप, कधी वाघ, कधी चित्ता वा सर्वांचे मिश्रण बनतो. पूर्वजन्मी या योनीतून गेले असल्यामुळे तो काहीसा किंवा थोडा -थोडा सगळ्यांसारखा वागतो. हे प्रकार , या तऱ्हा पूर्वयोनीतल्या असल्या तरी अजून आढळतात. तुमच्यावर जर कोणी संमोहन केलं तर लोक कुत्र्याप्रमाणे भुंकू लागतील किंवा वाघासारखे वागतील. हे होऊ शकते. हा सर्व भूतकाळ आपल्याबरोबरच अजूनही आहे. अशा या अनाकलनीय, व्यक्तिमत्वाचे काही लोक घुबडासारखे होतात, फार गंभीर, तर काही चिमण्यांसारखे चिवचिव करणारे. या अशा चित्र-विचित्र स्वभावांमुळे त्यांना सरळ मार्गावर आणणं अवघड काम आहे. त्यांची खूप गुंतागुंत झालेली असते. म्हणून मला प्रथम हा गुंता सोडवायचा आहे आणि मग त्यांची कुंडलिनी चढवायची आहे.

या यंत्रणेतला सागळ्यांत चांगला भाग असा की चेतना ही उर्ध्वगामी आहे, सुप्त-चेतना डावीकडे आणि परा-चेतना उजवीकडे. मध्यमार्ग हा सुषुम्नेचा आहे. महालक्ष्मीचा आहे, हा मार्गच तुम्हाला विराटाकडे नेणारा आहे. म्हणून आता या तीन गोष्टी एकत्र घटित होणार आहेत; मेंदूमध्ये विराट, ह्दयांत शिव आणि लिव्हरमध्ये ब्रम्हदेव अशा तीन शक्ती आहेत. पण तुम्हाला जेव्हा आत्मसाक्षात्कार होतो त्यावेळी तुमची बुध्दी शिवतत्वाला म्हणजेच आत्म्याला शरण येते. बुध्दीच हे शरण येणं कुठल्याही शक्तीकडून होत नाही तर आत्मशक्तीमध्ये ती सामावून जाते. बुध्दीच्या या आत्म्याला शरण जाण्यामुळे ती आत्म्याकडून प्रकाशित होते आणि या प्रकाशामुळेच बुध्दीला सूक्ष्माचं ज्ञान मिळवण्याची क्षमता येते आणि हे तुमच्या बुध्दीला कळावं अशाच मंगल घटना घडत

असतात. लोकांना असे अनुभव एकदां, दोनदा, तीनदा आल्यावर त्यांना आश्चर्य वाटतं, मग त्यांच्या डोक्यात विचार येतो की मला एवढे आशीर्वाद कसे मिळाले ? मलाच कसा हा लाभ मिळाला ? माझ्यात एवढा बदल कसा झाला ? मग हळु हळु ते आपल्या हृदयावर विसावतात, म्हणजे त्यांचा आपल्या आत्म्यावरचा विश्वास वळावतो आणि त्यातून आपल्या भक्तीवरचा विश्वास वळावतो, अशा तऱ्हेने ही अनन्य भक्ती होते तेव्हा आशा, इच्छा, उपकार सर्व काही संपून जाते. इतकी एकरूपता निर्माण होते. कारण या अवस्थेत बुध्दी व आत्मा एकरूप होतात. यावेळी ब्रम्हदेवसुध्दा शरण होतो आणि तुमची लिव्हर प्रकाशित बुध्दीकडे खेचली जाते. हे झालं, तुम्ही जे काही कराल ते दिव्य होणार, मग तुम्ही गायक, सरकारी नोकर वा आणखी कोणीही असा, तुमच्या बुध्दीकडून स्वाधिष्ठान वा ब्रम्हदेवाकडून, ते दिव्यच (प्रकाशित) कार्य होईल. बुध्दी प्रकाशित होऊन परमात्म्याशी योग पावल्यामुळे जे काय तुम्ही कराल, ज्या कल्पना कराल ते सर्व प्रकाशात आले असल्यामुळे तुम्ही ते प्राप्त कराल. हे नीट समजून घेतलं पाहिजे, साक्षात्कारी व्यक्तीला काहीही मिळवण्याची शक्ती प्राप्त असते, अर्थात त्याच्या इच्छा मात्र दैवी असायला हव्यात.

काल बघा, आपल्या प्रोग्रामला फार थोडे लोक होते. सगळे सहजयोगी अस्वस्थ होते - जसं काही त्यांच्या कुटुंबातील कोणी निवर्तलेत - अगदी फारच निराश कारण कां ? तर हे त्यांनीच ठरवलेलं होतं आणि जागृत असूनही त्यांच्या या प्रयत्नात यश मिळेल असं दिसत नव्हते. म्हणून ते फार असमाधानी, दुःखी होते. यामध्ये त्यांनी आपलं जीवन परमेश्वरी कार्याकरीतां पूर्णपणे अर्पण केलं हेच दिसते. त्यांना हा कार्यक्रम हीच सर्वांत मोठी गोष्ट होती सगळे लोक असे नसतात. काहींना दुसरीच कुठली तरी गोष्ट जास्त महत्वाची वाटते. ते सहजयोगाचा उपयोग स्वःसाठी जरूर करतील. पण जे सहजयोगाचाच विचार (स्मरण) करत राहतात, हेच प्रकाशित बुध्दीचं लक्षण, त्यांना तो मिळतो, त्याच्यामागे काही स्वार्थी हेतु मात्र असू नये, कसली द्वेषाची भावना असू नये किंवा काही तरी प्रदर्शन करण्याची जाहिरातबाजीपणाची वृत्ती वगैरे नको. पण फक्त सहजयोग आणि त्याच्या कार्याचा शुध्द विचार असेल तर तुम्ही ते मिळवणारच. परमेश्वरच तुम्हाला मिळाला असल्यामुळे तुम्हाला निराश व्हायचं कारण नाही. तोच तुमचा गुराखी आहे - तुम्ही गुराख्याच्या छत्राखाली शरणागत कोकरासारखे झालात की हे सहज शक्य होते. मग तुमची बुध्दी प्रकाशित झालेली असल्यामुळे तुम्हाला आत्मविश्वास मिळतो. डोक्यातले प्रश्न आणि शंका संपल्या की तुम्हाला निर्विकल्प स्थिती मिळते. या बुध्दीमुळेच, विचार, शंका, बध्दता आणि अहंकार निर्माण होतात. या डोक्यातूनच (मेंदू नावाच यंत्र) सगळे खेळ चालतात, द्वेष-मत्सर होणं, मूर्खपणाचंही समर्थन करणे, दुसऱ्यांवर टिका करणे, द्वेष करणे, दुसऱ्यांची चेष्टा करणे हे सर्व त्याचे उद्योग. पण श्रीकृष्ण सर्वव्यापक असल्यामुळे त्यांच्याकडे असले गुण नाहीत. म्हणून ते कधी तुम्हाला पापी, अपराधी समजले नाहीत. त्यांनी कुणावर टिका केली नाही. मला मात्र टिका करणं भाग आहे. एखादा कंस असेल तर त्याला मारलं पाहिजे, जरासंधाला मारा, नरकासूर खतम् व्हायला पाहिजे. याबाबत वादविवाद वगैरे नकोतच, या फालतू गोष्टी नकोतच. सरळसोटपणा वरा. दुसऱ्यांवर टिका करून काय उपयोग ? त्यांना ठार करा; त्यांना ठार केलं नाही तर या कलियुगात ते पुन्हा अवतरतील.

सगळ्यांत चांगलं म्हणजे लोकांना या राक्षसांपासून अलग करा. कारण ते त्यांच्यामुळे भ्रमिष्ट झाले आहेत. यासाठी एक तर ते राक्षस आहेत ही गोष्ट मी तुमच्या डोक्यात भरवू शकते पण तरी लोकांनी ऐकलं पाहिजे ना ? काय होतं की तुम्ही त्यांच्याजवळ गेलात की तुमच्या डोक्यात नसत्या कल्पना येतात, तुमच्या बोटांवर सुया-टाचण्या बोचल्यासाररखं जाणवतं. हे सर्व तुमच्या बुध्दीच काम आहे जिचा परिणाम तुमच्या मज्जातंतूवर होतो आणि ते तुम्हाला जाणवतं. त्यांना कापरं भरते. माझ्या उपस्थितीत बुध्दी कामाला लागते कारण ती शक्तिमधे

खोलवर शिरते. जसं मी एखाद्याकडे नुसतं पाहते ! एक खोडकर मुलगा होता, तो लोकांना मारायचा, चावायचाही पण मला पाहिल्यावरोबर पळून गेला. तो सगळ्यांवर धावून जायचा पण त्यावेळी पळाला. भूत अंगांत शिरलेले लोक माझ्यासमोर कापायला लागतात. अशा पछाडलेल्या लोकांवर, जे वेडेवाकडे हातवारे करतात, कोण प्रभाव पाडते ? तर ती बुध्दीच. त्यांच्या बुध्दीत वैगुण्य असते आणि श्रीकृष्ण त्यांना कापायला लावतात; ते या सुया-टाचण्यांमुळेच, ती बोच व गरमी त्यांना जाणवते. हे सर्व प्रकाशानंतरच्या मज्जासंस्थेमधून होते., मेंदू आपला शांत राहतो, एरवी प्रमाणे तो काही प्रतिक्रिया करत नाही, या ठिकाणीच खूप घाईत असलेले, निराश, अस्वस्थ, त्रस्त व चिडखोर लोक पाहिले. माओ बद्दल त्याच्याच एका वैयक्तिक डॉक्टरने म्हटले आहे की तो पूर्णपणे क्रूर सैतान होता, त्याच्याइतका क्रूर माणूस दुसरा कोणी पाहिला नव्हता, त्याचा चेहरा फक्त दिखाऊपणा होता, तो मोठा सुधारक होता, त्याने खूप काही केलं पण तितकाच तो खोटारडा होता. खोटारडा माणूस तुम्ही कसा ओळखणार. तुम्ही साक्षात्कारी झालात तरच तुमच्या बुध्दीकडून ते समजेल.

श्रीकृष्ण जर तुमच्या बुध्दीमधे आले तर तुम्ही ज्ञानी (प्रकाशित) होता. (स्थितप्रज्ञ) तुम्हाला पुष्कळ ज्ञान मिळते. जे जरूर आहे ते सर्व ज्ञात होते. विम्बलडनमध्ये कोण जिंकला, एकाद्या अभिनेत्रीचं आयुष्य किंवा एकाद्या देशाचा राष्ट्रपती इ. बद्दल कदाचित तुम्हाला माहिती नसेल, पण ज्याची तुमच्या स्वतःसाठी जरूर आहे ते सर्व समजेल, ज्यासाठी इतर लोकांना खूप श्रम घ्यावे लागतात. मी एक माणूस पाहिला होता की त्याला दोन हजार गाड्यांचे व टेलिफोनचे नंबर पाठ होते. याची काही जरूरी आहे कां ? या फालतू गोष्टीत कितीतरी मानसिक शक्ती वाया जाते. स्थितप्रज्ञ माणूस असं करत नाही. त्याच लक्ष ज्ञानाकडे, परमेश्वरी कार्याकडे व ते समजण्याकडे असते. असा माणूस जणू फार शक्तीशाली कॉम्प्यूटर असतो. आज मी कबीरांबद्दल बोलायला लागताच सर्वांना चैतन्य जाणवले. फक्त साक्षात्कारी लोकांनाच (त्यांची मज्जासंस्था इतकी तीव्र असते) फक्त बरोबर काय व चूक कोणते हे ओळखू शकतात, त्यांना परमेश्वरी शक्तीची जाणीव होते. अवतारी व्यक्ती कोण हेही ते जाणू शकतात. तुमच्या मज्जासंस्थेतील हा बदल तुमच्या लक्षात येत नाही, खरं म्हणजे एक नवी दिशा (दृष्टी) तुम्हाला मिळालेली असते आणि ती प्रगट होत असते. ही सर्व श्रीकृष्णाचीच कृपा आहे, ते सामुहिकततेतूनच आपल्यामधे आहेत आणि त्या सामुहिकतेतच त्यांच कार्य चालू असते.

अमेरिका हा श्रीकृष्णांच्या मंगलशक्तीचा प्रदेश आहे म्हणून त्यांचं मांगल्य कशांत आहे हे समजून घेतलं पाहिजे. त्यांना सोळा हजार बायका होत्या, त्या त्यांच्या सोळा हजार शक्त्या होत्या. आपलं अवतारकार्य करण्यासाठी त्यांना त्यांची जरूरी होती म्हणून त्या राजकन्या म्हणून जन्माला आल्या आणि त्यांना पकडून तुरुगात डांबले होते. म्हणून त्याने त्या राजाशी युध्द करून त्यांची मुक्तता केली आणि नंतर त्यांच्याशी विवाह केला. आता लोकांना, एका माणसाला त्यांचं वय कितीही असलं तरी सोळा हजार बायका कशा असू शकतील हे समजणार नाही. ते योगेश्वर होते. पुरुषांना हा प्रश्न पडतो पण स्त्रियांना नाही कारण त्या माता होतात. वडीलपणाविरुध्द आव्हान करता येतं. म्हणून त्यांनी पंचमहाभूत तत्वांशी विवाह केला, व त्यांच्या पांच पत्नी झाल्या. पण नितीतत्वाच्या मूलभूत अर्थ द्रौपदीच्या बाबतीत प्रत्ययाला येतो. तिला भर दरबारात आणून दुर्योधनाने दुःशासनाला तिची वस्त्र दूर करायला सांगितले. त्यावेळी तिने साडीचा पदर दातांनी पकडून ठेवला आणि फक्त "कृ" या शब्दाने श्रीकृष्णाला हाक मारली. नुसते "कृष्ण" म्हणताच साडी खाली पडली. त्या शब्दाचा आवाज श्रीकृष्णांना द्वारकेमध्ये एकू आला, तावडतोब शंख, चक्र, गदा, पद्म ही चार आयुधे घेऊन ते गरुडावर आरूढ झाले. आपल्या बहिणीच्या शिलाच रक्षण करण्यासाठी एवढ्या लांबून धाऊन आले, त्यांच्या दृष्टीने बहिणीच्या पावित्र्याच रक्षण ही फार मोठी गोष्ट होती, त्यांनी साड्यावर साडया पुरवल्या. द्रौपदीचं चारित्र्यं इतकं शुध्द व पवित्र होते आणि श्रीकृष्णाने तिचं रक्षण

केले ही फार महान कहाणी आहे.

हा योगेश्वर म्हणजेच श्रीकृष्ण एक धन्वंतरी पण होता - डॉक्टरांचा डॉक्टर तेच सर्व काही ठिक करतात कारण बुध्दी आणि चैतन्य मज्जासंस्थेतून वहात असतात. आपल्या बुध्दीतून ते लोकांना ठीक करतात. कसं ? समजा एखाद्याला हृदयाचा त्रास आहे, त्याने माझ्या फोटोकडे नुसते हात जरी केले तरी त्याला डाव्या हाताच्या मधल्या बोटांवर समजू शकते. मेंदू कार्यरत असतो आणि माझ्याकडून श्रीकृष्णाच्या चैतन्यलहरी तेथे येतात आणि त्यांचे संदेश चालू होतात, मी श्रीकृष्णही आहे म्हणून हा कॉम्प्यूटर चालू होतो आणि त्या व्यक्तिला कसला त्रास आहे हे लगेच तुम्हाला समजतं. की ह्याला हृदयाच्या विकार आहे. त्यासाठी काही परिक्षा - चाचणी करायची जरूर नाही, तुम्ही तात्काळ समजू शकता. हे कोण करतं ? हे श्रीकृष्ण - तत्व विराटाच्या बुध्दीतून कार्यान्वित होते. आता तुमची खात्री पटली असेल. हे कसं कार्यान्वित होतं, कशा घटना घडतात आणि ते तुमच्यामधून कसा संपर्क बनवून राहतं हेही तुम्ही जाणतां. माझा कॉम्प्यूटर असा संपर्क बनवतो. मानवानं बनवलेल्या कॉम्प्यूटरमधून नुसतं बटन दाबून काम करवून घेऊ शकता पण इथे असं काही होत नाही. तुमच्या मेंदूतून आपोआप उत्तरं मिळत राहतात, ताबडतोब, दुसऱ्या माणसाद्वारे. त्याच मेंदूकडून काय करायचं त्याची तुम्हाला सूचना मिळते आणि त्याचेकडूनच ते कसं करायचं हे पण समजते. त्याच मेंदकडून चैतन्य लहरी बाहेर पडत असतात आणि त्याचा लहरी या मेंदूमधे वाहू लागतात आणि याच लहरींकडून या माणसामधे काय बिघाड आहे हे तुम्हाला समजतं. अंतरंगापर्यंत आंत शिरण्याच हे कार्य श्रीकृष्ण करत असतात.

ते चैतन्यलहरी एकाकडून दुसऱ्या मेंदूमध्ये नेतात, तिथे मध्यवर्ती मज्जासंस्थेद्वारा त्या मेंदूचं कार्य सुरु होते आणि तुम्हाला त्याचे परिणाम समजतात. माझ्यासमोर हात केल्या केल्या ताबडतोब हे घटित होते. म्हणजे आपल्या मेंदूकडे लक्ष ठेवणे किती महत्वाचे आहे. बघा, अमेरिकेममधील मेंदूबद्दल मला फार काळजी वाटते कारण टी. व्ही. चालू केला, रस्त्यावरील प्रकार पाहिले. जाहिराती बघा किंवा संगीत ऐका, या सर्वांमुळे मेंदूचा सत्यानाश होत असतो. सगळं वातावरणच श्रीकृष्णांच्या विरोधी आहे, शुध्दता हा शब्दच त्यांना समजत नाही. नितीमत्तेचं नाव नाही. त्यांचे सिनेमे तरी काय, वाट्टेल तो संहार, अनैतिक प्रकार, वाट्टेल त्या गोष्टी, सगळं त्यात आहे आणि हे सर्व हीन प्रकार श्रीकृष्णांच्या भूमिवरच ! स्वतः योगेश्वर असल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारांनी सर्व काही शुध्द करणारा, तसाच पूर्णपणे अलिप्त असलेला, कशाबद्दलही आसक्ती न ठेवणारा. या मेंदूकडूनच सर्व प्रकारची आसक्ति निर्माण होते. आता हे कार्पेट आहे किंवा ही साडी आहे, साडीकडे पाहून मला वाटतं "माझी साडी छान आहे", ती माझी साडी आल्यामुळे ती कुठे ठेवणार, ती खराब होणार नाही ना, ती फाटणार वगैरे नाही ना इ. काळज्या डोक्यात आणायच्या, असंच प्रत्येक बाबतीत काळजी करत राहायचं. किंवा रस्त्यातुन चाललात तर भरपूर दुकाने असतात आणि तुमचं चित्त तिकडेच लागतं आणि या सर्व गोष्टीमध्ये मेंदू अडकून जातो आणि मग हे पाहिजे, ते पाहिजे वगैरे सुरु.

बाह्य वस्तूबद्दलची आसक्ती सोडायची असेल तर तुमच्यातील औदार्य विकसित व्हायला हवं. सहजयोगात असलेल्या पुष्कळ लोकांमध्ये उदारपणा कमी असतो. औदार्य म्हणजे काय ? तर माझी साडी तुम्हाला आवडली तर मी लगेच "घेऊन जा" असं म्हणणे. हाच खरा उदारपणा. मी जे काही खरेदी करत असते ते देण्यासाठी या भावनेतून. तुमची वृत्ति अशी उदारपणाची व अलिप्त असेल तर तुम्ही भौतिकामध्ये गुंतत नाही, आणि जी भौतिकता उरते ती फक्त प्रेमाची. मी रशियामधे गेले होते तेव्हां तिथे चांगली माशांची अंडी - कॅव्हियर नावांची पाहिली. लंडनमध्ये एका डॉक्टरला ती फार आवडायची. त्याच्यासाठी मी ती विकत घेतली, तो फार खुष झाला की माताजी या लहान-लहान गोष्टीही लक्षात ठेवतात. दुसऱ्याला आनंद देण्याची भावनाच या गोष्टीतून दिसते. असं करताना प्रेमाने पण निरासक्त असयला हवं, त्यालाच

अलिप्तपणा म्हणतात. ते पूर्णपणे अलिप्त असतात, अलिप्ततेमधे प्रेम कसं असतं ? जसं झाडांमधील रस असतो जो झाडाच्या पाना-पानापर्यंत सर्वत्र पसरतो, एकाच भागाकडे तो जाईल असं होत नाही. तसं झालं तर ते झाडच मरेल आणि फळ पण मरेल.

निरासक्त प्रेम कसं असते ? ते फारच सुंदर असते. पहिल्याप्रथम अशा प्रेमातून कुणाला काय द्यायचं, लोकांना काय मिळाल्यामुळे आनंद व समाधान होईल, त्यांना काय आवडतं हे तुम्हाला समजेल. मग तुमच्या लहान-लहान वस्तू देण्यातही प्रेम येते; मी अशाच वस्तु खरेदी करते कारण तुम्हाला त्या आवडतील हे मी ओळखते. तुम्हीसुध्दा असंच करत रहा. ही अलिप्तता पूर्ण व पूरेपूर असायला हवी, तरच लोक तुमच्याकडे आकर्षिले जातील, एरवी नाही. अलिप्तपणा जपला नाही तर दुसऱ्या व्यक्तिबद्दल खरं प्रेम तुमच्यामध्ये निर्माण होणार नाही. दुसऱ्याकरता काही करताना तुमच्या मनात पैशाची, हावरेपणाची, अप्पलपोटेपणाची किंवा अधिकाराची वगैरे भावना असेल तर त्या करण्याला काही अर्थ नाही. सहजयोगात येतानाही काही लोक पैसे मिळवण्याच्या किंवा आजारातून बरे होण्याच्या हेतून येतात. पण तुम्ही अलिप्तपणा राखाल तरच सहजयोग पसरेल. जोपर्यंत तुम्ही कसली ना कसली आसक्ती बाळगून रहाल तोपर्यंत तुम्ही खरे सहजयोगी नाही हे ध्यानात ठेवा. आत्मपरीक्षण करून मी कशात, किती व कां अडकलो आहे हे बघा. तुम्ही डोळे काढा किंवा हात कापून घ्या वगैरे नाही म्हणत. आसक्तपणापासून नेहमी निराशाच पदरी येत असते. आपल्या मुलांचे लाड करणारे आणि त्यांच्यावरच प्रेम करणारे माता-पिता तर फारच वाईट. पण मुलांवरही जर तुम्ही निष्काम प्रेम केलंत तर त्यांच्यासाठी तुम्ही चांगल्याच गोष्टी कराल, त्यावरोबरच कशाला नाही म्हणायचं ते तुम्हाला समजेल. मला असं केलेलं आवडणार नाही, तसं करू नकां हे पण मुलांना सांगावच लागते.

अलिप्तता ही खरं तर याहूनही सूक्ष्म आहे व तिचा अर्थ विस्तृत आहे. काही लोकांना खाण्याच्या गोष्टी खूप आवडतात, त्या बाबतीत निरासक्त असणं त्यांना खूप अवघड होते, विशेषतः विशिष्ट वयांत चांगलं चमचमीत खाण्याची त्यांना हौस असते. गांधीजी म्हणत की माणसाने विशिष्ट चवीचा आग्रह धरू नये; पण सहजयोगात आल्यावर आणि गहन झाल्यावर या गोष्टी आपोआप नाहीशा झाल्याचं तुम्ही पाहाल. खाण्याबद्दलचे तुमचे सर्व चोचले नाहीसे होतील. जेवणावरची आसक्ती कमी झाल्याचं हे लक्षण आहे. मला तर काहीच खाल्लं नाही तरी काही फरक पडत नाही, त्याच्यामुळे मला अशक्तक्तपणा येत नाही की असमाधानी वाटत नाही. पण खाण्याबद्दलचा विचार करणं म्हणजे बुध्दी खराब करून घेणं. "आम्ही त्यांच्या घरी गेलो होतो, त्यांनी फारच सुंदर जेवण केलं होतं" या म्हणण्याला काय अर्थ आहे ? तुम्ही ते खाल्ले म्हणजे झालं, ते सर्व संपलं, त्याचा कशाला विचार करता ? तसंच "आम्ही अमक्याच्या घरी गेलो होतो, काय बेकार जेवण होतं ?" ह्यालाही काही अर्थ नाही. त्याचा विचार केल्यानं तुम्ही काय खाल्लंत ते परत मिळणार नाही किंवा जे खाणार आहात ते बदलणार नाही. तुमच्या दातांच्या आरोग्याला जे अयोग्य आहे ते कधी खाऊ नये. उदा. म्हशीचं मांस दाताला फार वाईट, म्हणूनच त्या लोकांचे दात लवकर पडतात. पुष्कळ लोक मला विचारतात की माझे दात खरे आहेत काय म्हणून. त्यांना ते माझेच आहेत हे खरं वाटत नाही. दातांकरतां काय खाऊ नये मला माहीत आहे. पण त्यावरोबरच कुठल्याही एका मताला चिकटून राहू नये., ती आणखीनच सूक्ष्म आसक्ती आहे. त्यामुळेच या जगाचं खूप नुकसान झालं आहे, उदा. जातीयवाद, मूलतत्त्ववाद वगैरे.

लोकांमध्ये किती विरोधाभास आहे पहा. ते रंग काळा पडण्याकरतां समुद्रकिनारी जातात आणि दुसरीकडे काळे-गोरे भेद पाळतात. मग समुद्रावर कशाला जायचं ? आणि मग काळ्या लोकांचा द्वेष का करायचा ? याला कारण म्हणजे बुध्दी संतुलनांत नाही आणि म्हणून जात-पात माजले. हे नाही तर दुसऱ्याच प्रकारचा आग्रह (कंडिशनिंग) जसा भारतात तर खूप जाती-पाती आहेत. जर सर्वांच्या

हृदयांत आत्म्याचाच वास आहे तर जात वेगवेगळी कशी होईल ? वरच्या जातीचे लोक खालच्या जातीतल्या लोकांकडचं काही खाणार पण नाहीत. हे सगळे प्रश्न आपणच आपल्या डोक्यातून निर्माण केले आहेत. आजपर्यंत या पृथ्वीवर, भारतातच नव्हे तर परदेशातही, अवतरलेल्या सर्व संतांनी या जातीभेदाविरुध्द प्रखरपणे सांगीतले आहे. तरीही लोकांच्या डोक्यांत अजून तेच चालू आहे. इतरांपेक्षा ते वरच्या जातीचे कशावरून हे त्यांनाच विचारा. जर्मन लोक स्वतःला उच्च श्रेणीचे समजतात, त्यांच्यावर कोण विश्वास ठेवणार ? या जर्मन लोकांनी लहान मुलांनाही विषारी वायुच्या खोल्यांत कोंडून ठार मारलं व जल्लोष केला, ते अगदी हलक्या कुळातलेच असले पाहिजेत आणि वर स्वतःच्या उच्च कुळाचे गोडवे गातात. हे कसं शक्य आहे ? स्वतःला दुसऱ्यांपेक्षा श्रेष्ठ समजणे, स्वतःला दुसऱ्यांपेक्षा सुंदर समजणे आणि दुसऱ्याला कुरुप म्हणणे हा सर्व मूर्खपणा मेंदूतून निर्माण होतो आणि त्यांतूनच अहंकार बळावतो आणि हाच अहंकार मग तुमच्या डोक्यावर बसतो.

नारद, तिन्ही लोकांतला ऋषी स्वतःला फार मोठा समजत होता कारण तो अजून स्त्रिकडे आकर्षिला नव्हता आणि शंकराला पण आव्हान देत होता. मग श्रीकृष्णाने एक युक्तक्ती चालवली. त्याने दोन गंधर्वांना त्याला चिडवण्यासाठी पाठवले. ते नारदाकडे येऊन म्हणाले "तू इतका सुंदर, रूपवान पुरूष आहेस, तिकडे त्या लावण्य-सुंदरी रूपवतींचं, राजकन्येचं स्वयंवर चाललं आहे तिकडे तू का जात नाहीस ? ती तुझ्याशी नक्कीच लग्न करेल. त्यांनी त्याला इतकी भुरळ घातली की तो हवेत तरंगायला लागला. तो स्वतःला खुबसुरत समजून तिकडे गेला. हा सर्व त्याचा अहंकार होता. तो आल्यावर राजकन्या वरमाला घेऊन आली आणि त्याच्याकडे पाहून काहीतरी कुजबुजली आणि मोठ्याने हसत निघून गेली. नारद काहीच न समजल्यामुळे त्या दोघा गंधर्वांकडे बघू लागला. त्याला खूप राग आला आणि तो तलावाजवळ आला ; त्याने पाण्यात पाहिले आणि त्याला आपला चेहरा माकडासारखा दिसला. हा अहंकार तुम्हाला माकड बनवतो आणि तुम्ही स्वतःला फार मोठे, सुंदर असं - तसं समजू लागता ; पण तसे तुम्ही खरं नसता कारण तसे असता तर असा विचार मनांत आला नसता. तुम्ही जे आहांत त्याच्यावर विचार करू नकां. मी माणूस आहे हा सुध्दा विचार करू नकां. तुम्ही जे कोणी आहात त्याचा तुम्हाला गर्व होतो. मी सुंदर आहे, अमुक आहे, तमुक आहे वगैरे. श्रीकृष्ण मग आपल्या मायेची लिला चालवतात आणि त्या माणसाला धडा देतात. म्हणून आपण फार मोठे आहोत, हे मिळवलं, ते केलं, असं समजून स्वतःला बादशहा मानू नकां. हा अहंकारच बळावून तुमच्या डोक्यात या नसत्या कल्पना रूजवतो. आणखी तसेच पुढे गेल्यावर तुमच्या डोक्यात 'हिटलर' निर्माण होतो आणि तुम्ही त्याच्यासारखे बनून जाता. तुम्ही फार 'कण्डिशन्ड' झालेले असाल तर तुम्हाला काही सांगणंच अवघड आहे. त्या एका 'हरे-रामा'ला मी विचारलं की एवढ्या थंडीमध्ये तू धोतर कशाला नेसतोस तर तो म्हणतो माझ्या गुरूने तसं सांगीतलं आहे म्हणून. तुम्हाला थंडीचा त्रास वाटू देणारा हा कसला गुरू ? मी आई आहे, मला असले वेडे प्रकार आवडत नाहीत. ह्या कसल्या मूर्खपणाच्या, अनर्थक, वेडेचाराच्या बाधा ? या बाबतीत अमेरिकेतले लोक फार आकृष्ट होतात (वश होतात), त्यांना मूर्खपणाची कसलीही कल्पना नुसती सांगा, ते लगेच त्याच्यामागे धावतील. मादक औषधे, वेड्यावाकड्या फॅशन्स इ. ते सारं पॅरिसमध्ये बनतं आणि अमेरिकेत खपतं. ते नेहमी काही तरी नवीन शोधत असतात. मग ते माकडासारखं का असेना. श्रीकृष्णाच्या भूमीतल्या या अमेरिकन लोकांना काय घ्यावं काय घेऊ नये एवढासुध्दा विवेक कसा नाही मला कळत नाही. कुठल्याही बाबतीत काही प्रगल्भता नाही.

हंस चक्राकडून, ज्यांचं नियंत्रण विशुध्दी करत असते, मिळणारा विवेक संपून जातो. अमेरिकेत भेटलेल्या एका प्रतिष्ठित महिलेनं मोठ्या गर्वात मला सांगीतलं "तुम्ही इंग्लंडमधल्या 'पब' (Pubs) मधे कधी गेलात कां ?" मी एका प्रसिध्द पबमधे गेले होते, त्याचं नाव

'हर्मिट'. तिथे मेलेल्या माणसांच्या शरीराची दुर्गंधी आणि कोळ्यांची जळमटं असतील तशी जपून ठेवतात". ती म्हणाली की तिला तिथे फार दिव्य वाटलं. पुढं ती गर्वाने म्हणाली "आम्ही स्वतंत्र लोक आहोत. मी मुलांना दारु प्यायला सुध्दा नाही म्हणत नाही". ती मुलं जेमतेम बारा व चौदा वर्षाची असतील. तीन चार महिन्यानंतर आम्हाला समजलं की तिच्या लहान मुलाचा वाढदिवस झाला आणि त्या दिवशी त्याच्या सर्व मित्रांना दारु दिली. सगळीकडे मेणबत्त्या पेटवल्या होत्या आणि आग लागून सबंध घर भस्मसात झालं. आणखी कुणी म्हणेल की त्याने कितीतरी बायका ठेवल्या ! हे सर्व लोक महामूर्ख आहेत. जणू असे लोक नरकांत जाण्याकरता सर्व तयारी व व्यवस्था करत आहेत. ते नरकांतच जाणार आहेत. त्यांना हेच सांगायला हवं. तुम्ही असंच वागलात तर दुसरं काय होणार ? हे सर्व काही जमा होऊन त्यांचाच नाश होणार आहे. अमेरिकन लोकांना अशा विनाशकारी गोष्टीच का आवडतात मला समजत नाही. आणि ते सुध्दा श्रीकृष्ण हेच दैवत तिथे असतांना ! म्हणून सहजयोग्यांनी हे समजून घ्यायला हवं की आपल्यात इतकं परिवर्तन व्हायला हवं की जे विनाशकारी आहे ते टाकूनच द्यायला हवे.

प्रथम म्हणजे पुष्कळ पुरुष आणि स्त्रिया गंभीर चेहरे करून बसलेले मी पाहते. तुम्ही असे का होतां ? तुम्ही 'लीलाधरा'च्या राज्यात आहांत ; त्यानेच प्रत्येकाला नाचायला लावले आणि स्वतः राधाबरोबर रासक्रिडा खेळला, जी प्रकाशित मनःशक्तीला धारण करते. लोक इतके अधार्मिक, अनितीमान होऊन विनाशाच्या मार्गाकडे कसे चालतात ? सकाळ-संध्याकाळ अशा मूर्खपणाच्या उद्योगांत गर्क झालेल्या या अमेरिकन लोकांना श्रीकृष्णच वाचवणार आहेत. राजकारणातही त्यांच्याकडे कोणी सुजाण व्यक्ती नाही. इतरांवर टिका करण्यांत ते पटाईत आहेत. भारतात प्लेगचा थोडासा प्रादुर्भाव झाला आणि या लोकांनी त्याला सर्व प्रसीध्दी माध्यमातून खुप जाहिरात दिली. त्यांनी आपल्या जहाजांना व विमानांना येण्याची बंदी घातली आणि नसता डांगोरा पिटून आम्हाला खूप त्रास दिला. तुम्ही तुमच्याकडचा एड्स् सगळीकडे पाठवला त्याचं काय ? ज्यांच्या बुध्दीला श्रीकृष्णांकडून प्रकाश मिळाला आहे तेच लोक फ्रॉइड सारख्या माणसाला मान्यता देतात हे एक आश्चर्यच आहे. आता तुमचा सर्वनाश व्हायची वेळ आली आहे आणि तुम्ही काळजीत पडला आहांत. आता त्यांची कुटुंबसंस्था मोडकळीस आली आहे. तर्क-वितर्कातून घेतलेले त्यांचे सर्व विचार श्रीकृष्णांच्या विरोधात आहेत. समाजकार्य ज्यांच्या हातांत आहे ते लोकांना सुखाने जगू देणार नाहीत. लोकांना आपापसांतच लढू दे किंवा वाटेल तसं वागूं दे पण आपली खुर्ची शाबूत राहावी अशीच त्यांची वृत्ती आहे. नितीमत्तेची त्यांना मुळीच चाड नाही आणि आपल्याच देशांतील मुलांवर, युवकांवर आणि लोकांवर किती वाईट परिणाम होतो आहे याची काहीच पर्वा नाही.

आज आपण योगेश्वराचा म्हणजेच श्रीकृष्णाचा सन्मान करत आहोत. तो खातो आणि काहीच खात नाही ; झोपतो पण झोपत नाही, त्याला अनेक पत्नी आहेत पण पत्नी नाही असा हा योगेश्वर आहे. तुम्ही योगी आहांत आणि तो तुमचा ईश्वर आहे म्हणून तुम्ही त्याच्यासारखं बनलं पाहिजे. तुमची बुध्दी त्याच्या आशिर्वादाने प्रकाशित होऊ दे आणि तुमचं व्यक्तिमत्व इतकं महान होऊ दे की तुमच्यात सर्व काही सामावून येईल, तुम्ही सर्व काही पाहू शकाल, योग्य काय व अयोग्य काय हे समजण्याचं तारतम्य तुम्ही मिळवाल, ह्या अमेरिकेची सध्याची वाईट स्थिती बदलण्यासाठी तुम्ही तुमची सर्व शक्ती आणि मन पणाला लावाल. हे फार महत्वाचं कार्य तुम्हाला करायचं आहे. श्रीकृष्ण हे कुबेर आहेतच. त्यांच्या पायाशी लक्ष्मी लोळत आहे. त्यांनीच तुम्हाला सर्व वैभव दिलं आहे. त्यांचे पुरेपूर आशिर्वाद तुमच्याजवळ आहेत ; म्हणून तुमच्याजवळ पैसा, बुध्दी भरपूर आहे. सर्व काही आहे, कोणती गोष्ट कमी असेल तर सूज्ञता. जसं तुमच्याजवळ गाडी आहे, किल्ल्या पण आहेत पण तुम्हाला गाडी चालवता येत नसेल तर कसं होईल ?

परमेश्वराचे तुम्हां सर्वांना अनंत आशिर्वाद.

# श्री ख्रिस्त पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण

## गणपती -पुळे - २७ डिसेंबर १९९४

ख्रिस्तांचा जन्म फार गरीबीच्या परिस्थितीत झाला आणि यातूनच परमात्मसत्ता ही कुठल्याही परीस्थितीमध्ये व अनेक संकटांसमोरही कार्यरत असते हे दिसून येते. त्याला त्याच्याच कुटुंबियांकडून पुष्कळ विरोध झाला. त्या जन्म ज्यू कुटुंबात झाला आणि त्यावेळी ज्यू लोकच त्याला मानायला तयार नव्हते. पण त्यांनी त्याला मारले नाही ही महत्वाची गोष्ट पण आपण लक्षात घ्यायला हवी. जनसमुदायाला एखाद्या व्यक्तिला ठार करण्यास कुठलाही कायदा सांगत नाही ; पण त्याच्या बाबतीत रोमन साम्राज्यातील एका रोमन जज्जनेच त्याला तसं ठार मारण्याची शिक्षा ठोठावली.

ख्रिस्तांच चरित्र आचरणांत आणणं अवघड आहे कारण ते पूर्णपणे ईश्वराचेच अवतरण होते. म्हणूनच त्यांनी जे काही नियम व पध्दती ख्रिश्चन लोकांकरता सांगीतले त्यांचे पालन करणं अवघड होते , फारच थोड्या लोकांना त्यांच्या जीवनाचा खरा अर्थ समजला , कारण ते म्हणत की तुमच्या नजरेमधे काही पाप आले तर ते डोळे काढून टाका , तुमच्या हाताने काही गुन्हा केला तर तो हात कापून टाका. त्यांच्या दृष्टीतून गुन्हा हीसुध्दा एक सूक्ष्म बाब होती. तुमच्या उजव्या गालावर कुणी थप्पड मारली तर डावा गाल त्याच्यासमोर करा , अशा गोष्टींच आचरण करणे अशक्य होते. शिवाय ते असंही म्हणायचे की हे इतरांनी नव्हे तर तुम्हीच करायचं आहे. ते फार थोडं आयुष्य जगले. ते भारतात येऊन राहिले होते. त्याबद्दल मी पुस्तकांत वाचलं आहे आणि पुराणांतही संस्कृत भाषेमध्ये पण त्याचा स्पष्ट उल्लेख असल्याच पाहून मी आश्चर्यचकीत झाले. त्या काळी माझे पूर्वज शालिवाहन त्याला भेटले होते व म्हणाले होते "तुझं नांव काय ? " तर ते म्हणाले "माझं नांव 'इसा-मसी' (Issa Massi) आणि माझ्या देशांत म्लेच्छ लोक फार आहेत म्हणून मी इकडे आलो". म्लेच्छ म्हणजे मल-इच्छा म्हणजे जे लोक फक्त घाणेरड्या गोष्टीच करत असतात. मग त्यांनी ख्रिस्ताला सांगीतले "तू परत तुझ्या देशांत जाऊन त्यांना निर्मल धर्म शिकव". अगदी हेच शब्द वापरणं आणि तेसुध्दा संस्कृतमध्ये स्वच्छ लिहून ठेवलेलं असणं आश्चर्यकारकच. तर त्यांनी असंही सांगीतले की " त्या लोकांना तू सुधार , त्यांना स्वच्छ कर". पण दुर्दैव बघा की ते ज्या लोकांच्या कल्याणाकरतां झटले त्या लोकांनीच त्यांना क्रूसावर चढवले.

आत्ताचा ख्रिश्चन धर्म पाहिला तर त्याला काय म्हणावं समजत नाही. ते नेहमी सहजयोगाला विरोध करत असतात , ख्रिस्तांनीच होली घोस्ट (Holy Ghost) येणार हे सांगीतल्याचा अर्थच त्यांनी कधी समजून घेतला नाही. शिवाय काही ख्रिश्चन लोकही सहजयोगात आल्यावर आधीच्या चालीरिती सोडत नाहीत. पण आतां ते सर्व संपले आहे ! आम्हीही मानतो की मानवांना मदत करण्यासाठी ख्रिस्तांचा अवतार होणं महत्वाचं होते. तुम्ही आज ज्या पायरीवर आहांत ती चढून तुम्हाला वरच्या पायरीवर यायचे आहे. याचा असा अर्थ नाही की तुम्ही ख्रिस्तांची पूजा करू नकां. उलट ते करावंच , पण ते जुन्या कल्पना व रूढींना चिकटून राहून करणं हे बरोबर नाही , कारण त्यांनीच तुम्हाला सहजयोगासाठी सिध्द केले.

त्यांच्या जीवनांतून तुम्ही काय घेणार मला माहीत नाही. ते फार मोठे सहजयोगी होते आणि सामान्य माणसाजवळ असणार नाहीत अशा कितीतरी शक्ति त्यांच्याजवळ होत्या. विशेष म्हणजे त्यांचा त्याग , सहनशीलता , जे काही सांगीतले त्याचा स्विकार करण्याची तयारी. आईवरचं त्यांचे प्रेम. ते म्हणायचे "आई आली आहे , पहा". क्रूसावरसुध्दा ते नुसतं म्हणाले , "पहा , आई आली आहे". आपण हे लक्षात घेतलं पाहिजे की बायबलमध्ये सुध्दा ख्रिस्तांचे खरं स्वरुप दाखविलं गेले नाही. हे सगळ्यांच ग्रंथामध्ये होत आले आहे. म्हणून अनेक प्रश्न निर्माण झाले आणि लोक खऱ्या धर्माला व मार्गाला वंचित झाले. सर्व धर्मांच्या इतिहासात हचे घडलं , अशा तऱ्हेने खऱ्या अवतारी व्यक्तींना नावं ठेवली गेली , , ज्यांनी ते धर्म स्थापन केले त्यांनाच बदनाम केले गेलं. ख्रिश्चन धर्मातही हेच घडले. ख्रिस्तांनी जे सांगीतले त्याच्या अगदी विरुध्द ते वागत आहेत.

आपण सहजयोग्यांनी हे समजून घ्यायला हवं की ख्रिस्तांचे अवतरण आज्ञा चक्र उघडण्यासाठी झाले जी एक फार अवघड गोष्ट आहे. आज्ञा चक्र हे फार आकुंचित चक्र आहे. ज्यावर ते अधिष्ठित

आहेत आणि ते म्हणतात की तुम्ही स्वतःला आणि दुसऱ्यांना क्षमा केली पाहिजे. आज्ञा चक्राचा हाच मंत्र आहे. बीजाक्षरामध्ये यालाच आपण "हम्, क्षम्" म्हणतो. 'क्षम' म्हणजे दुसऱ्यांना क्षमा व 'हम्' म्हणजे स्वतःला क्षमा. आज्ञा चक्र उघडण्याकरतां याच बीजाक्षरांचा उपयोग होतो. आज्ञा चक्र उघडण्याचा सगळ्यांत सोपा उपाय म्हणजे निर्विचार जाणीव अवस्थेत येणे. या स्थितीमध्ये आज्ञाचक्र उघडते, ते उघडलं नाही तर ते फार वाईट असते, फारच वाईट आणि त्याचा तुम्हाला व इतरांना त्रास होतो. भूतबाधा झालेल्या लोकांना त्यां बाधांची आज्ञाचक्रांवर पकड घेते आणि मग ते त्यांच्या डोक्यांत शिरलेल्या दुष्ट वासनांच्या आहारी जातात. मग त्या दुष्ट शक्ति त्यांच्यावर पूर्ण वर्चस्व गाजवतात आणि मग तो माणूस असा विचित्र वागू लागतो की, आपल्याला समजेनासे होते. अमेरिकेत आता बीजगुणांवर (Genes) बरंच संशोधन होत असल्याचं आपल्याला माहीत आहे, पूर्वी कधीही कल्पनेतसुध्दा नसलेल्या गोष्टींबद्दल ते आतां बोलत आहेत. तरीही आजकाल महाभयंकर रोगांनी सूड उगवल्यासारखं त्यांना ग्रासले आहे. हे कां होत आहे त्यांना समजत नाही, एवढी सा‍री प्रगती, संशोधन होऊनही लोकांचे आजार वाढतच आहेत आणि या सर्वांच कारण समजणे त्यांच्या अकलेच्या पलीकडे आहे.

महत्वाची गोष्ट, तुम्हाला दैवी शक्तीचं संरक्षण, नितीमत्तेचं संरक्षण, परमेश्वरी नियमांच संरक्षण मिळायला हवे. असं संरक्षण नसेल तर तुम्ही कसल्याही प्रभावाखाली येऊ शकतां. अमेरिकेमध्ये मी पाहते की धर्माच्या बाबतीत तिथे अतोनात गोंधळ आहे, त्यांच्याकडे तऱ्हेतऱ्हेचे धर्म आहेत, अगदी सैतानाचा धर्म, पिशाच्च - चेटूक करणाऱ्यांचा धर्म पण. त्यांनी भौतिकशास्त्रांत प्रचंड प्रगती केली तरी ते लोक सतत कसल्यातरी भितीच्या दडपणाखाली वावरत आहेत.

आपण प्रथम मान्य केलं पाहिजे की ख्रिस्तांनी जी नितीमत्ता शिकवली ती आपल्या अंतरंगातील अविभाज्य भाग अशी होती. ते म्हणत " तुमच्या नजरेत पाप असायला नको". म्हणजे साध्या नजरेतूनही पाप घडू नये. तुम्ही एकदां एखाद्या स्त्रीकडे बघा, पण दुसऱ्यांदा बघाल तर ते पाप होईल. नितीमान माणसाबद्दलचे त्यांनी घालून दिलेले असे कडक नियम होते. तुम्ही आतां सहजयोगी झालेले असल्यामुळे सुजाण झाला आहांत व अशा नियमांचं तुम्ही इतरांपेक्षा विनासायास पालन करू शकतां. पण तरीसुध्दां काही गोष्टींबद्दल मला बोलणं भाग आहे. ख्रिस्तांनी म्हटलं होतं " मी स्वतःवरचा कुठलाही अन्याय सहन करेन पण होली-घोस्टविरुध्द काहीही खपवून घेणार नाही". ही फार महान गोष्ट आहे. ते क्षमेचं सागर असूनही म्हणतात "काहीही चालवून घेईन पण होली-घोस्ट विरुध्द काहीही नाही". लोक आश्चर्यचकीत होतील अशा अनेक घटना घडत आहेत. या गणपतीपुळ्यांतच सहजयोगाच्या विरोधांत असलेले एक चमत्कारिक गृहस्थ भेटले, त्यांनी गावच्या मामलेदाराच्या संगनमताने आम्हाला त्रास द्यायला सुरुवात केली. आम्ही यायच्या दहा दिवस आधी त्या मामलेदाराला निलंबित करण्यात आले. हे कसं झालं कुणाला समजलं नाही, पण ते झालं खरं. असे हे ख्रिस्तांचे कार्य आहे, गणेशांचे कार्य आहे यांत शंकाच नाही.

कुणाचा नाश व्हावा असं ममला वाटत नाही. पण सहजयोगाच्या आड येणाऱ्या सर्व लोकांचे ते असेच निर्दालन करतात. घटना कशा घडतात आणि हे कसं कार्यान्वित होतं सर्व मोठं आश्चर्यचकीत करणारं आहे. लोकांनी आपल्याला विरोध केला तरी घाबरून जायचं कारण नाही. त्यांना काय वाटेल ते करू दे, काही तरी घडून तुमचा प्रश्न अचानक संपेल आणि तुम्ही आश्चर्यचकीत व्हाल. अशा अनेक घटना घडतात आणि घडत आल्या आहेत. लोकांच्या अशा अनेक अनुभवांची, त्यांनी भगवान येशू ख्रिस्तांनी मदत केल्याची अनेक पत्र मला येतात. मला त्यांना काही सांगायची जरूर नाही, ते त्यांचे काम व्यवस्थित जाणतात.

सहजयोगी म्हणून आपलं वर्तन कसं असायला हवे हे समजणं महत्वाचं आहे. सर्वात महत्वाच सध्याच्या आधुनीक युगात "मी कोण आहे" हे प्रत्येक सहजयोग्याने जाणलं पाहिजे. हे अगदी नम्रपणाने, मुद्दाम सांगते. तुम्ही मला ओळखलं पाहिजे, माझा आदर-सन्मान ठेवला पाहिजे आणि माझ्यावर प्रेम केलं पाहिजे. शब्दात आणखी सांगायचं म्हटलं तर मी म्हणेन की तुम्ही माझ्याशी प्रतारणा करू नका. एका बाजूने माझ्यावर प्रेम करायचं आणि दुसऱ्या बाजूने मलाच त्रास होईल असं वागायचं हे चूक आहे.

आजपर्यंत सामूहिक जागृती झाली नाही. सामूहिक जागृतीशिवाय लोकांना परमेश्वराचे अवतार ओळखता आले नाहीत तर त्यांना दोष देता येणार नाही. साक्षात्कार दिल्याशिवाय लोक हे कसं ओळखणार ? पण सामूहिकतेत मिळालेल्या साक्षात्कारानंतर तुम्ही तसं ओळखू शकला नाहीत तर ती गंभीर गोष्ट आहे. तुम्ही तुमच्या जुन्या वेडगळ समजूतींना चिकटून राहू नका. काही हिंदू म्हणवणाऱ्या लोकांना जर मी सांगीतलं की आता देवळांत जाणं, उपास-तापास वगैरे ब्राम्हणांच्या तऱ्हा सोडून द्या तर त्यांना ते मुळीच आवडणार नाही. तुम्ही आता संत झाला आहांत हे लक्षात घेतलं पाहिजे. संतांना कुठली जात-पात, वर्ण वगैरे नसते. तुम्ही हे जैन लोकांना सांगीतलं किंवा बुध्द-धर्मी लोकेंना सांगीतलं तर त्यांनाही आवडणार नाही. त्याना फक्त त्यांच्या पूर्वापार परंपरेतून आलेल्या प्रवृत्तींनाच चिकटून रहायला हवं असते.

मला ओळखणं म्हणजे मी आदिशक्ति आहे हे मानणे एवढंच नाही तर तुमच्या जीवनात क्षणोक्षणी मी तुमच्या बरोबर आहे याचं भान राखणं.

सहजयोगाची शिस्त आपोआप निर्माण व्हायला हवी. त्याबद्दल मला काही सांगायची जरूर नाही. पण जर तसं झालं नाही तर मला सांगावच लागते. तर पहिली शिस्त म्हणजे तुम्ही मला नीट ओळखलं पाहिजे आणि माझा आदर बाळगला पाहिजे.

दुसरी शिस्त म्हणजे सहजयोग्यांनी कसं असायला हवं हे शिकणे. कल्पना करा की ख्रिस्त आतां इथे तुमच्याबरोबर असते तर माझ्याशी कसे वागले असते व इथे असलेल्या सहजयोग्यांबरोबर कसे वागले असते ? कुणाचा कसलाही मूर्खपणा त्यांना खपत नसे, ते काही ऐकणारच नाहीत. मला खूप गोष्टी आवडत नाहीत पण मला वाटते की कालान्तराने असले प्रश्न सुटतील आणि सर्व काही ठीक होईल. तरी पण मी पाहते की कित्येक सहजयोग्यांना अजून जबाबदारी समजत नाही. ख्रिस्तांनी खांद्यावर सूळ नेले, तुम्हाला आता तसं काही कराव लागणार नाही. उलट तुमच्या गळ्यांत हार पडणार आहेत, पण आधी तुम्ही त्या हारांसाठी लायक बनले पाहिजे. कुणाला कसलाही त्रास होणार नाही, सर्व काही सुरळीत जुळून येणार आहे. जसं काही सोन्याने मढवल्यासारखे. त्याच्यावर कसं चालायचं एवढं मात्र तुम्ही समजून घेतले पाहिजे. म्हणून दुसरा मुद्दा मी मांडते तो म्हणजे तुम्ही अगदी पारदर्शक बनलं पाहिजे; आत एक बाहेर एक असली प्रतारणा नको.

एकच ध्येय व ध्यास. म्हणजे चोवीस तास तेच करायचं असं नाही. तुम्हाला तुमचं कुटुंब आहे, मुलंबाळं आहेत, तुमचं स्वतःचे जीवन आहे. ते सर्व चालू असताना तुम्ही सतत परमात्म्याच्या संधानात असायला हवं. (Connected), प्रपंचात गुंतल्यासरखं राहून सहजयोगाची सामूहिकता तुमच्या हातून बिघडेल असं व्हायला नको. तुमचे संबंध, भाऊ-बहीण, आई-वडील चालू राहू देत पण सहजयोग हीच तुमची मुख्य जबाबदारी आहे. ते सोडून तुम्ही या नसत्या गोष्टींमध्ये अडकून बसलात तर सहजयोगाच्या सामूहिकतेला बाधा येईल आणि उगीचच राजकारण सुरु होईल.

दुसरी गोष्ट म्हणजे तुमचं नात फक्त सहजयोग्याशी आहे. दुसऱ्या कोणाशीही नाही. हे फार महत्वाचं आहे. मला हे तुम्हाला अगदी स्पष्टपणे सांगावयाचे आहे की सहजयोग्याशिवाय दुसरं कोणीही मोठा नाही. अर्थात तुम्ही इतर लोकांना भेटावं, त्यांच्याशी बोलावं, त्यांच्याबरोबर संबंध ठेऊन त्यांना सहजयोगात आणायच आहे याच्याबद्दल काही शंका नाही, पण कोणा सहजयोग्याला फसवू नका, खाली पाडू नका. तुमच्यामधे आपापसात काही मतभेद असतील तर त्यांचं निराकारण करा. बाहेर तुम्ही सर्वांनी एक राहिलं पाहिजे. एकदा सत्य समजल्यावर मतभेद राहू नयेत. कशाकरतां अशी भांडणं ? आणि तरीही मतभेद असतील तर आधी आपलं काही चुकलं आहे का हे ओळखा आणि ही चूक काय आहे तर तुम्ही स्वार्थी आहांत आणि सहजयोगाव्यतीरिक्त दुसरीच कसली तरी काळजी करीत आहात. माझ्याप्रमाणे वागणं अवघड वाटेल. मला पण मुलं आहेत, नातवंड आहेत पण मी त्यांना कधीही टेलीफोन करत नाही. माझे पती मात्र त्यांच्याबद्दल काळजीत असतात, त्यांना टेलीफोन करत असतात, मला मात्र ते सर्व ठीक आहेत हे माहीत असते. त्यांच्या बाबतीत मी माझं कर्तव्य केलं आहे, आता मी, माझी मुलं, माझे पती, माझं कुटुंब यामध्येच माझं आयुष्य वाया घालवणार नाही, कारण सारं विश्व हेच आतां माझं कुटुंब आहे. म्हणजे तुम्ही विशाल बनायला हवं, सहजयोग्यांनी विशाल बनायला हवं. ते जर त्यांच्याच कुटुंबात मुलांबाळांत, त्यांच्याच कामांत गुंतणार असतील तर सर्व अवघड होऊन जाईल. हे 'स्व' मधे राहणं आता पुरे, ते पूर्णपणे संपलं पाहिजे. जीवनाबद्दल तुमची दृष्टी विस्तारली पाहिजे. आपण सर्वजण एक विश्व - कुटुंब आहोत हे सहजयोग्यांच फार मोठं कर्तव्य आहे.

आजच्या लग्नांकडेच पहा, कोणी म्हणतय् मला आवडत नाही, मी भारतीयांबरोबर लग्न करणार नाही, कुणी भारतीय म्हणतो मी विदेशी व्यक्तीबरोबर लग्न करणार नाही. तुमचं मन जर इतकं क्षुद्र असेल तर लग्नालाच नांव द्यायचं नाही, तुम्ही मला लग्नाबद्दल विचारायचंच नाही. आपल्याला आतां स्वतःचा धर्म - जात - देश यांच्या पलीकडे जायचं आहे. तुम्हाला हे जमत नसेल तर तुम्ही सहजयोगी नाहीत. तुमचं हृदय विशाल झालं पाहिजे. हे महत्वाच आहे. भारतामध्ये जात-पात हाच मोठा प्रश्न आहे. मला ते समजतच नाही. मी शंभर वेळा सांगीतलं आहे की सगळ्यांच्या हृदयांत आत्मा आहे तर मग या जाती कुठून आल्या ? तुमच्या आवडीप्रमाणे जात असेल तर गोष्ट वेगळी पण जन्माने कुणाची जात ठरत नाही. पुष्कळ उदाहरणं दाखवून हे सिध्द करतां येईल. पाश्चात्य देशातला पाहून वाईट प्रकार म्हणजे वर्ण पध्दती. मी रुमानियात गेले होते तेव्हा तिथे बरेच जिप्सी पाहीले, त्यांना कुत्र्यासारखं वागवतात; इतके त्यांना हीन समजतात. खरं तर हे जिप्सी चांगले लोक आहेत, त्यांच्यात काही कमी नाही. त्यांचे चारित्र्य चांगलं आहे, स्त्रियांच्या बाबतीत त्यांचे नियम चांगले आहेत आणि आयुष्यात ते नितीमत्ता संभाळतात. ते समूह करून राहतात पण त्यांना फार वाईट वागणूक मिळते, इतकी किळसवाणी की भारतातसुध्दा असं कधी पाहयलामिळणार नाही. या रुमानियन लोकांची अशी कोणती विशिष्ट जात किंवा वंश नाही. त्यांना जर्मन, इंग्रज किंवा आंग्ल-सॅक्सन असंही म्हणता येणार नाही. त्यांची इतरत्र आढळणार नाही. एवढी मोठी संख्या पाहून मला आश्चर्य वाटलं. इंग्लंडमध्ये सुध्दा तोच प्रकार,, तिथेही त्यांना वाईट वागणूक मिळते. खरं तर हे लोक फार प्रेमळ आहेत आणि त्यांच्याजवळ खूप कला आहेत. आमच्या प्रोग्रामला त्यांची संख्या पाहून मला आश्चर्य वाटलं. म्हणून आपलं चित्त जीवनाच्या विशालतेकडे असावं, दुःखी-दीन लोकांकडे असावं ही मुख्य बाब आहे. जे दुःखी आहेत, ज्यांना अनेक प्रश्न आहेत, ज्यांना मदतीची जरूर आहे अशा लोकांची काळजी घ्या. जे आपल्याला पैशाची मदत करतील अशांबरोबर मैत्री नको. दीनदुबळ्या लोकांचा कैवार घ्या. त्यांना वर काढण्यासाठी तुम्हाला सहजयोग मिळाला आहे असं काहीतरी कार्य करा. बाशीमध्ये मी गरीब लोकांना विनापैशाने औषधोपचार करण्याची माझी योजना आहे. आपण मध्यम लोक, ज्यांना आयुष्यात साध्या-सुध्या गरजा भागवता येत नाहीत त्यांना आपण मदत केली पाहिजे, त्यांना सहजयोगांत आणलं पाहिजे आणि होईल तेवढी मदत त्यांना केली पाहिजे. मी लग्न ठरवते तेव्हा विकसित व विकसनशील देशांमध्ये समन्वय ठेवण्याचा प्रयत्न करते हे तुमच्या लक्षात आलं असेल. त्यातून

एक देवाणघेवाण होते. पण काही लोक यांत जास्त गर्विष्ठ असल्याचं मी पाहिलं आहे. असा विचित्र शिष्टपणा तुमच्यामधे आला तर ते ख्रिस्त-धर्माविरुध्द होईल. म्हणून सहजयोगी म्हणून आपण हे लक्षात घेतलं पाहिजे की सहजयोगाच एक तत्व असं आहे की छोट्या-मोठ्या किरकोळ गोष्टींच्या आणि बंधनांच्या, ज्यांच्यापसुन आपल्याला व इतरांनाही त्रास होतो, आपल्याला पार जायचं आहे. आपण जेव्हा सामूहिकतेत येतो तेव्हा सर्वांनी सामूहिक बनायचं आहे हे आपण समजलं पाहिजे. मग ध्यानाकरतां आपल्याला मोठे महाल वगैरे हवा असल्या प्रकारांची गरज उरत नाही. प्रार्थना व ध्यान करायला कुठलीही जागा चालते. तुम्ही कुठेही असलात तरी काय पाहिजे ते मागु शकता. तुम्ही आता गणपतीपुळ्यात आहांत तिथे विशेष आराम नसेल हे पण मला माहीत आहे, रहायला पण ३-स्टार हॉटेलची व्यवस्था नाही तरी पण तुम्ही सर्व आनंदात राहता. एकमेकांवर प्रेम करता, अशी तुमची संगत समाधानकारक आहे. असं समाधान हे एकमेकांतल्या प्रेम, वात्सल्य, आपुलकी, एकता अशा भावनांमधून मिळत असते. मग तुम्हाला आरामदायक सोयी, करमणूक वगैरेची आठवणही होत नाही. अचानक डॉंचशे लोक जास्त आल्याच कळल्यावर जमेल तशी तात्पुरती व्यवस्था करणं भाग पडले आणि तरीही तुम्ही तक्रार करत नाही. या तुमच्या सोशीकपणाबद्दल मी तुमचे आभार मानते.

शारिरीक सुखसोयींपेक्षा आत्म्याचं सुख जास्त महत्वाच आहे. तुमच्या शरीराला जर आराम हवा असेल तर ती सवय मोडायचं शिका. शरीराचे तुम्ही गुलाम न होता शरीरालाच तुमचा गुलाम बनवा. हे जर तुम्हाला करायचं नसेल तर सहजयोगांत तुम्ही हरवून जाल. कारण मग तुम्ही सारखं गाडी बंगला वगैरे - वगैरे बद्दलच बोलणार. शरीराचे फार लाड केलेत तर आत्म्याचा प्रकाश कमी होतो. तुमच्या चेहऱ्यावरची झळाळी निघून जाते. मनाची शांती नाहीशी होते. तुम्ही शारीरिक सुखाची चिंता करत राहण्यापेक्षा ते सर्व परमात्म्याकडे सोपवा. काळजी कशाची करायची आहे ती म्हणजे तुम्ही जीवनांत प्रामाणिक, दैवी- गुणी व समर्पित राहण्याची. तेच तुमचं काम आहे. आपण किती शरण आहोत इकडे लक्ष द्या, मी खरा सहजयोगी आहे कां ? सहजयोगाकरतां मी काय करतो. ? सहजयोगसाठी मी काय केलं किंवा कराव इकडे लक्ष द्या. हे केलं नाही तर तुमचं मन उलट दिशेने पळायला लागेल आणि मग 'हे चांगलं नाही. ते नको, हे हवे' इ. चालू. मला सहजयोगाकरतां काय करायचं आहे, सहजयोगांतून मला काय कार्यान्वित करायचं आहे, सहजयोगाचा प्रसार मी कसा करणार आहे इ. विचार तुम्ही करायला लागलात तर तुमचं मन दिव्य अनुभवाच्या प्रकाशात आल्याचं कळून तुमचं तुम्हालाच नवल वाटेल, दुसऱ्या कुणी तुम्हाला काही सांगायलाच नको, सर्व काही आपोआप घडून येईल. तुमच्याजवळ शक्ती आहे. सर्व काही आहे, तुमच्यामधील हा स्त्रोत प्रवाही होण्याचाच अवकाश.

आता आणखी एक मुद्दा म्हणजे आपण कोण आहोत हे जाणलं पाहिजे. सहजयोगांत याला फार महत्व आहे. ख्रिस्त म्हणाले " मी ईश्वराचा पुत्र आहे", अगदी ठासून म्हणाले आणि तेवढ्यावरून लोकांनी त्यांना सुळावर चढवलं. " मी ईश्वराचा पुत्र आहे" असं त्यांनी अगदी उघडपणे सांगीतले ते एक सत्य होते., त्या सत्यावाच त्यांनी पुनरुध्दार केला. म्हणून आता सहजयोग्यांनी पण "मी आदिशक्तीचा मुलगा (मुलगी) आहे" असं म्हटलं पाहिजे. एकदा तुमच्या मनांत हे ठसलं, तुम्हाला एकदम परिवर्तन झाल्यासरखं वाटू लागेल कारण ही फार उच्च स्थिती आहे, अगदी अभूतपूर्व पायरी आहे. असं म्हणू लागलात की तुम्हाला तुमची जबाबदारी समजेल. तुम्हाला आश्चर्य वाटेल जे लोक अगुरुबरोबर होते ते सहजयोगांत आल्यावर अगदी उदार, कर्तव्यनिष्ठ आणि नम्र होतात कारण त्यांनी आधी खूप सोसलेलं असते. एरवी एकदम सहजयोग सुरु केलेल्या लोकांना अशी भावना नसते. आधी अनेक संकटातून पार पडल्यानंतरच तुम्हाला जे मिळालं आहे त्याची किंमत कळते पण हे सहजच मिळालं तर ते लोकांच्या लक्षात येत नाही.

आपण याबरोबरच सतत आत्मपरीक्षण केले पाहिजे. पहिल्या प्रथम हे बघायचं की मी नम्र आहे का ? मी कोणासमोरही नम्र होऊ शकतो का ? हे फार महत्वाचं आहे. उतावळा रागीट स्वभाव फार वाईट. श्रीकृष्ण म्हणाले होते की उतावळेपणातूनच सगळं सुरु होते. राग हा लिव्हरमधून सुरु होतो म्हणून वाईट आहे आणि तो मी कसा दूर करणार हे जाणू शकतां. या रागामुळे सारी सामूहिकता संपून जाईल, दैवी चैतन्याचं सौंदर्य नाहीसं होईल, रागीट माणूस जर देवाबद्दल बोलू लागला तर लोक त्याच्यापासून दूर निघून जातात. हा रागीट स्वभाव सोडला पाहिजे.

शिवाय आपल्याला कुठल्या गोष्टीचा राग येतो हे पण तुम्ही तपासून घेतलं पाहिजे. काही लोकांना वाटतं की रागावणं हा त्यांचा अधिकार आहे, पण सहजयोगात तसं नसते, मारामारी करायची जरूर नाही. काही प्रश्न निर्माण झाला असेल तर मला सांगा. मी बरेच वेळा लोक भांडत असलेले, मारामारी करत असलेले पहिलेत आणि मला नवल वाटायचं की हे आपापसांतच का भांडणं करत आहेत ? हळु हळु, जसे तुम्ही आध्यात्मिक प्रगल्भता मिळवाल ही सर्व भांडणं मिटतील आणि ज्याला तुम्ही वेगेवगळे ग्रुप समजत होतात ते पण राहणार नाहीत. सहजयोगच तुमचं खरं स्वरूप उघड करेल आणि तुम्हाला टिकू देणार नाही, लोक मग तुम्हाला बरोबर ओळखतील. आपल्याला राग का येतो हे समजण्याचा प्रयत्न करा. काय कारण आहे ? दुसऱ्याच्या ज्या कृतीचा तुम्हाला राग येतो तीच गोष्ट तुम्हीही करत असाल, तुमच्यातही काही दोष असेल. म्हणून सहजयोगातून होणारी ही एक प्रकारची स्वच्छता आहे आणि ते महत्वाच आहे. ख्रिस्तांच्या मदतीची आपल्याला जरूर आहे कारण आपल्या तार्किक विचारप्रणालीने आज्ञाचक्रावर पकड आलेली असते. प्रत्येक बाबतीत तार्किकपणाची आपल्याला इतकी सवय असते की कुणाचा खून करूनही आपण त्याच समर्थन करायला बघतो, वर म्हणतो "मी काय करणार ? ते तसंच होणार होते". एकदा आत्मपरीक्षणाची

सवय लागली की हे सर्व प्रकार थांबतील. फार राग आला असेल तर आरशासमोर उभे रहा आणि स्वतःवरच रागवायचा प्रयत्न करा.

आता आसक्तीबद्दल. ही आसक्ती फार सूक्ष्म असते. पूर्वी माझा अनुभव होता की पाश्चात्य सहजयोगी त्यांच्या मुलांवर फारसं प्रेम करत नसत, पण आतां ते मुलांना चिकटून असल्यासारखे झालेत. त्यांना सहजयोगाचा प्रचारही त्यांच्या मुलांच्या मर्जीप्रमाणे चालावा असं वाटते. भारतीय सहजयोगी पण मुलांमध्ये खूप गुंतून जातात. मी आधीच सांगितले आहे की आसक्ती आली की प्रेम संपलं समजा. तुम्ही ज्यांच्यावर प्रेम करतां त्या सर्वांवर जशी त्यांना गरज आहे तेवढंच प्रेम करा. तुम्ही प्रवाही बनलं पाहिजे. एकाच जागी थांबून चालणार नाही. ती तुमची जबाबदारी नाही तर परमात्म्याच्या सत्तेची आहे आणि ती त्याच्यावर सोपवा. मग तुम्हाला कळून येईल की तुमची मुलं सुधारतात, तुमचे संबंध सुधारतात, सर्व काही ठीक होते कारण तुमची जबाबदारी संपलेली असते. तुमच्या सिमित विचारांचा तुमच्या संबंधांवर परिणाम होतो, मी तर चक्क म्हणेन की आशा सिमीत नाते-संबंधांनी प्रत्यक्षात ते संबंधच गुदमरून जातात. तुमची दृष्टी विशाल करा, तसेच बुध्दी विशाल होऊ द्या मग तुम्हाला समजेल. निसर्गाकडे पाहिलंत तर हे पटकन् समजेल. पाणी पहा, ते सगळ्या झाडांकडे जाते (मिळते) एकाच झाडाला मिळेल असं नाही., तसं झालं तर सारं काही संपून जाईल. तुम्ही सामूहिकतेचा विचार करता तेव्हां तुमची अलिप्तता चांगली हवी, कशाच्या तरी मागे लागून किंवा कसल्याही हेतूने लहान-सहान संबंधांमधे अडकू नका - जगातील कुणापेक्षाही तुम्हाला सहजयोग सांभाळणे सोपे आहे कारण ते इतर लोक साक्षात्कारी (जागृत) नाहीत. तुम्ही साक्षात्कारी आत्मे आहांत.

आता इतर म्हणजे पैशाची आसक्ती पहा. काही लोक सहजयोगातही दुकानासारखं, बाजारासारखा उपयोग करतात. उदा. ते म्हणतात "माताजी, याची किंमत निम्मी करायची कां, पाव करायची कां, काही सूट देऊ या, किंवा सेल ठेऊ या". पस्तीस टक्के लोक फुकट आलेले असतात आणि ज्यांना द्यायची शक्ती आहे त्यांना निम्मी किंवा जास्त सूट पाहिजे असते. अशा लोकांना काय म्हणायचं मला माहीत नाही. मला वाटतं की दान करण्याचीच ही एक संधी असते आणि दिलेला हा पैसा सगळ्यांत वाटला जातो. हा पैसा एकाच व्यक्तीला मिळतो असं नाही तर तो इतरांच्याही उपयोगी येतो. कारण बाहेरून येणाऱ्या बऱ्याच लोकांची इतका खर्च करून येण्याची ऐपत नसते. आपण सर्व जगाचा जेव्हा विचार करतो तेव्हां अशा तऱ्हेने पैसा सर्वांनी मिळून वापरायला हवा हे आपण लक्षात घ्यायला हवं. एवढं नीट समजून घेतलंत तर तुमची पैशाची आसक्ती कमी होईल. तुम्ही काहीच वाटून घ्यायला तयार नाही, लक्षावधी संपत्ती असली तरी तुम्ही दान करायला, वाटून घ्यायला तयार नसतां. सहजयोगातही पुष्कळ लोक असे श्रीमंत झाले पण तेही असं वाटून घेत नाहीत. आपण इथे पैशाकरतां एकत्र जमलो आहोत असं मी म्हणत नाही पण तुमची वृत्ती सहकाराची हवी. सहजयोगाने आपल्याला एवढं दिलं मग आपण त्याच्याकरतां काय केलं ? आपण काय मिळून घेतो ? उलट आपल्यात पुष्कळ लोक हपापलेले आहेत, त्यांना आणखी पाहिजे असतं. इतर काही लोक सारखे कर्ज काढत असतात, काही लोक दुसऱ्यांचा स्वतःच्या कामासाठी उपयोग करून घेतात. या सर्व फालतू गोष्टी सहजयोगात कामाच्या नाहीत. तुम्हाला त्यांची जरूर नाही., जे जरूर असेल त्याची नुसती इच्छा केलीत की ते तुम्हाला मिळेल. तर काही लोक दुसऱ्यांचा फायदा उपटतात, काही लोक स्वतःचंच रक्षण करण्याच्या प्रयत्नात असतात. तुमचं मन अगदी स्वच्छ व खुलं हवे म्हणजे तिथे सहस्त्रार उघडते. तुम्हाला हृदय चक्र माहीत आहे आणि सहस्त्रार उघडल्यावर हृदय-चक्र पण उघडते. तुमचं हृदय उघडू द्या म्हणजे तुम्हाला आनंदी-आनंद मिळेल. आता मला काही पहायचं आहे. तर डोळे बंद ठेऊन पाहण्याचा आणि त्यातील आनंदाचा लाभ मला मिळेल कां ? तुम्हाला हृदयापासून कसली भावना समजून घ्यायची असेल तर हृदय उघडल्याशिवाय ते कसं शक्य आहे ? म्हणून हृदय उघड होऊ दे म्हणजे मग काही अवघड नाही हे तुम्हाला सहज समजेल. हे आपल्याला सहज जमेल पण आधी आपलं हृदय उघडलं पाहिजे आणि एकमेकांबद्दल भावना हवी.

सहजयोग्यांनी एकमेकांचा आदर ठेवला पाहिजे. कुणी काळा आहे आणि कुणी गोरा आहे, कुणी उंच आहे, कुणी बुटका आहे, कुणी असा तर कुणी तसा. परमेश्वराने अशी विविधता निर्माण केली आहे नाही तर यांत्रिकताच झाली असती. या विविधतेचा आनंद आपण उपभोगला पाहिजे. ज्यातून निर्मितेचं सौंदर्य प्रतीत होते. बाहेरच्या गोष्टींचा तुमच्यावर मुळीच प्रभाव पडता कामा नये. लोकांनी नीट-नेटकं, व्यवस्थित रहायला हवं हे ठीक पण प्रत्येकानं आपल्यासारखंच असाव असं म्हणणं चूक आहे. भारतामधे तुम्ही इंग्रजी भाषा चुकीच्या तऱ्हेने बोललात तर त्याला, मागासलेल्या जातीसारखे नावं ठेवतात, इथे ही गुलामी - वृत्ती इतकी घट्ट झाली आहे की तुम्हाला तुमची भाषा, मातृभाषा वा हिंदी वगैरे बोलता नाही आलं तरी चालेल पण इंग्रजी बोलतां आलं पाहिजे. तिनशे वर्षे आपल्यावर सत्ता गाजवलेल्या इंग्रजांचे गुलाम असल्याची ही वृत्ती आहे. त्यांनी स्वतःचंही काही कल्याण केलं नाही आणि रिकाम्या हातांनी इथून गेले. भारतातले ख्रिश्चन लोकही ख्रिस्ताचा जन्म इंग्लंडमधे झाला असं समजतात. ज्या देशात जन्म झाला त्या देशाबद्दल आपल्याला अभिमान वाटला पाहिजे हे आयुष्यांत महत्वाचं आहे, आपल्याला स्वतःचा देश असला पाहिजे पण आपण म्हणजे देश असं समजू नये. आपल्या देशाच्या सर्व चुकीच्या गोष्टींवर आपण टीका केली पाहिजे आणि आपल्यातील विचित्र लोक ज्यांची क्षमता मर्यादित आहे, जरा दूर ठेऊन त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागू नये. तुम्ही एकदा देशाच्या पलीकडच्या विचारांत आलात की अशा सर्व बंधनातून मुक्त होता. तुम्ही आता विशेष व महान लोक झाला आहात तर मग एकाद्या डबक्यात असल्यासारखे वागू नका. तुम्हाला आता समुद्रात उतरायचं आहे नाही तर गुदमरून जाल.

आणखी एक गोष्ट म्हणजे यंत्रामधून बनवलेल्या गोष्टी तुम्ही वापरु नये. शक्य तो टाळाव्या. या यंत्रामुळेच आपल्यासमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. हातांनी बनवलेल्या कापडाचे कपडे वापरावे किंवा लहान-सहान मशीनवर बनवलेल्या कपडाचे. कारण त्या मशीनपासून प्रदूषण होत नाही. सहजयोगी म्हणून निसर्गाची संतुलनता बिघडणार नाही याची आपण काळजी घ्यायला हवी. मला माहीत आहे की जिथे सहजयोगी आहेत तिथे चैतन्यलहरीमधून हे प्रश्न आपोआप सुटत असतात. पण त्यासाठी नैसर्गिक असमतोल नष्ट करण्याची तळमळ तुमच्यामधे असेल तर व्हायब्रेशन्स हे कार्य करतील. कुठेही गेलात तरी तुम्हाला प्रदूषण आढळणारच. ते दूर करण्याकरता निसर्गाचा समतोल बिघडणार नाही इकडे लक्ष ठेवायला हवे. नैसर्गिक प्रक्रिया बिघडवणाऱ्या वस्तू आपणच निर्माण करत असतो, म्हणजे आपणच त्याला जबाबदार आहोत. म्हणून आपणच त्यात सुधारणा करण्याचं काम करायला हवं.

आणखी एक गोष्ट सांगायची म्हणजे आपल्यापेक्षा गरीब व कमनशीबी लोकां ची पण आपण काळजी घेतली पाहिजे. वातावरणाची काळजी घ्यायला हवी व त्यांतील नको त्या फालतू गोष्टी टाकून दिल्या पाहिजेत, त्यासाठी आपली जीवनपध्दती सरळ व सोपी ठेवावी ज्यामुळे उगीचच वाहने आणि तत्सम त्रासदायक गोष्टींची जरूर भासणार नाही. अशा अनेकानेक प्रकारांतून आपण वातावरणाची काळजी घेऊ शकतो आणि ती आपलीच जबाबदारी आहे. वयाच्या ४७ वर्षांपर्यंत मी सुती कपडेच घालत होते, रेशमी तर नाहीच. सहस्त्रार उघडल्यानंतरच मी हे इतर कपडे वापरायला लागले.

आपले जीवन असं असायला हवं की आपण आजूबाजूच्या जिवंत क्रियांबद्दल संवेदनशील बनू, त्याकरतां या गोष्टींकडे तुम्ही किती सतर्कपणे ध्यान देता याला महत्व आहे. जसं आजकाल भारतामध्ये पुष्कळ नवीन-नवीन चांगल्या गोष्टी मिळू लागल्या आहेत. एकदा मी कुणाला म्हटलं " तुम्ही जर्मनीमधुन कां नाही मागवत ?" तर तो म्हणाला "जर्मनीमधे मिळतात की नाही मला माहीत नाही" त्यावर मी म्हटलं "तुला माहीत नाही कां की जर्मनीमधे त्याचे मोठे कारखानेच आहेत" तो म्हणाला "तुम्हाला कसं माहीत माताजी" तर मी फक्त "मला माहीत आहे" एवढंच म्हणाले. मी ज्या ज्या देशांत जाते तेथील इत्यंभूत माहिती मला असते, अगदी बारीकसारीक तपशीलसुध्दा. म्हणून त्यांच्याकडे एवढा मोठा धंदा असल्याचं यांना माहीत नसावं याचं मला आश्चर्य वाटलं. तसंच आपल्या देशामध्येच कलाकुरीच्या किती सुंदर वस्तु बनतात याची आपल्याला माहिती नसते, म्हणून त्या गरीब कारागीरांना मदतीची जरूर आहे. ख्रिस्तांना अगदी हलाखीच्या परिस्थितीत कां जन्म मिळाला ? कारण त्या गरीबांना आशिर्वाद देऊन त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीचं काम त्यांना करायचं होतं, पण आज आपल्याला गरीबी कुठे-कुठे आहे व त्यासाठी आपल्याला बरंच काही करतां येईल. तुमच्या देशापुढील खरे प्रश्न समजणे अगदी सोपे आहे, लोक अजून गरिबीतच कां आहेत व त्यांच्यासाठी काय करतां येईल हे पण लक्षात येईल. पण त्यासाठी आपण हे ओळखायला हवे की आपल्यामधील प्रकाश जोपर्यंत सर्व समाजात पसरत नाही तोपर्यंत आपले सर्व प्रयत्न फुकट आहेत, म्हणजे सहजयोगाचा आनंद आपल्यापुरताच राहिला आहे, गणपतीपुळे वगैरे सर्व ठीक, पण बाहेरच्या लोकांच काय ? तसंच कला, संगीत, कलाकुसरीची निर्मिती यांना उत्तेजन देऊनही गरिबांना मदत होते. असल्या गोष्टींबद्दल तुम्ही जागरुक असायला हवं, इतर नसत्या गोष्टींमधून लक्ष काढून टाका. राजकारणाची काळजी करू नका, त्यातील सर्व भानगडी उघडकीला येतील, निकालात जातील आणि सर्व ठीक होईल. त्यांना झगडे वगैरे काय करायचं ते करु दे, ते मूर्खच आहेत. तुमचं लक्ष तुमच्या निर्मितीक्षमतेकडे असु दे, दुसऱ्याला कशी मदत करतां येईल इकडे असु दे. प्रत्येक गोष्टीमधे प्रेम असु दे, करुणा व अनुकंपा असु दे. प्रत्येक सहजयोग्याच्या दैनंदिन जीवनांत क्षणोक्षणी प्रेम व करुणेचा सहजसुंदर अविष्कार व्हायला हवा. "मला हे आवडत नाही, मी हे खात नाही" असलें प्रकार नकोतच; असं म्हणणारा सहजयोगी असूंच शकत नाही; तो नेहमी "काय छान आहे" म्हणत राहतो. कुणी तरी मला फळं खायला दिली; माझा घसा खराब होता तरीपण मी ती खाल्ली. हरकत नाही. तुम्हाला दुखवायचं नाही म्हणून मी ही भारी साडी नेसले. दुसऱ्याला खुष करण्यासाठी आपण काय करू शकणार नाही ? स्वतःच्या आवडी-निवडीकडे लक्ष न देता दुसऱ्यांना आपण आनंद द्यावा. "मला हे आवडतं, ते नाही आवडतं" याच्यापेक्षा इतरांना प्रसन्न कसं वाटेल इकडे लक्ष द्या.

परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी आपलं व्यक्तिमत्व, चारित्र्य आणि वागणूक अगदी स्वच्छ हवी. आश्चर्यकारक काम करणारे, चांगले सहजयोगी मला माहीत आहेत पण त्यांच्याजवळ अजून खूप - खुप करण्याची शक्ती आहे. म्हणून मी हे सारं ख्रिस्तांच्या जन्मदिनी आज तुम्हाला सांगत आहे. त्यांचं अनुकरण करणं फार अवघड आहे हे मी जाणते. पण आपण प्रत्येकजण एवढं तरी करु शकतो की ते सतत आपल्याजवळ आहेत याचं भान ठेऊन त्यांचा साधेपणा, सरळपणा, त्यांचे पावित्र्य व त्यांचे जीवन यांचे अनुकरण करू शकतो.

परमेश्वराचे तुम्हां सर्वांना अनंत आशिर्वाद.

# शिवरात्री पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण

### ऑस्ट्रेलिया : २६-२-९५ (सारांश)

आज आपण सदाशिवांची पूजा करण्यासाठी इथे जमलो आहोत. आपल्यामधील शिव, म्हणजे शुध्द आत्मा हे त्यांचेच प्रतिबिंब आहे. पाण्यामध्ये सूर्याचं प्रतिबिंब पडलं की ते प्रतीत होते पण दगडावर तसं प्रतिबिंब पडत नाही. आरशांत सूर्याचं नुसतं प्रतिबिंब पडत नाही तर त्याचा प्रकाशही आरशातून परावर्तित होतो. तसंच मनुष्यप्राण्यामधील परमात्म्याचं हे प्रतिबिंब त्याच्या व्यक्तिमत्वातून प्रकट होत असते. तुम्ही स्वतः जर स्वच्छ, स्पष्ट आणि अबोधित असाल तर हे प्रतिबिंब आरशासारखे असेल. साधुसंतांमधे परमात्म्याचं सुंदर दर्शन मिळते म्हणजे त्यांच्यामधे कुठल्याही वाईट प्रवृत्ती नसतात. अर्थात अशा कुठल्याही वाईट प्रवृत्तींपासुन मुक्त असलेला मनुष्य निर्मळ आत्मा होतो तेव्हां त्याच्यामधील दिव्यत्वाचं हे प्रतिबिंब दुसऱ्यांमधे परावर्तित होते.

तुम्ही नशीबवान, तुम्हां सर्वांना आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. म्हणजेच परमात्म्याचे प्रतिबिंब तुमच्या चित्तामधे कार्यान्वित झालं आहे; तुमचं चित्त आत्म्याच्या शक्तीतून प्रकाशित झालं आहे. आत्म्याची ही शक्ति तो प्रतिबिंब आहे म्हणून, म्हणजे ते प्रतिबिंब पाण्यापासुन किंवा आरशापासुन अलिप्त आहे. कारण पाण्यातील किंवा आरशातील प्रतिबिंब सूर्य जोपर्यंत आहे तोपर्यंतच असू शकते. म्हणजे सहजयोगी झाल्यावर तुम्ही स्वतःला स्वच्छ केलं आहे. कुंडलिनीने तुम्हाला स्वच्छ केलं आहे आणि आतां तुम्ही एक शुध्द व्यक्ति झाला आहात. म्हणूनच हे प्रतिबिंब अधिकाधिक स्पष्ट होत चाललं आहे; एवढंच नाही तर इतरांना त्याचा प्रत्यय येत आहे, तुमच्या चेहऱ्यावर, तुमच्या शरीरावर त्याची कांती आली आहे आणि तुमच्या कार्यातून, वागण्यातून सगळीकडून त्याचा अविष्कार होत आहे.

सर्वसाधारण माणसांचा आपण परमात्म्यांच प्रतिबिंब आहोत यावर विश्वास बसणं अवघड आहे. त्यांची घडणच अशी गुंतागुंतीची आहे की आपण एकाएकी परमात्म्याचं प्रतिबिंब कसे बनलो हे त्यांचं त्यांनाच समजत नाही. पण त्यांच्यामधे ती क्षमता आहे, ते खरोखरच परमात्म्याचे प्रतिबिंब बनू शकतात; त्यासाठी त्यांना स्वतःबद्दलच आत्मविश्वास असायला हवा. स्वतःच्या उत्क्रांत स्थितीवर विश्वास हवा आणि आपण आता आत्मा आहोत हे ठामपणे जाणायला हवे. सहजयोगावर खात्रीपूर्वक श्रध्दा असणे महत्वाचे आहे. आत्मविश्वासाशिवाय आत्मोन्नती शक्य नाही, माझ्या भाषणांमधूनही मी सगळ्यांना पूर्ण आत्मविश्वासांत राहण्याबद्दल सांगत आले आहे. अर्थात हा विश्वास कुठल्याही प्रकारे अहंकार वा आक्रमकतेशी संबंधित नाही. खरा आत्मविश्वासू मनुष्य कधीच आक्रमक नसतो.

चिनी लोकांत एक गंमतीदार कथा आहे. एका राजाला कोंबड्यांच्या झुंज खेळांत आपलीच कोंबडी जिंकावी अशी इच्छा होती. कुणीतरी त्याला सांगीतलं की अमक्या-अमक्या साधूकडे कोंबडी घेऊन गेलात तर तो तुमच्या कोंबड्यांना झुंज जिंकतील इतके ताकदवान बनवेल. म्हणून त्याने दोन कोंबड्या त्या साधूकडे दिल्या व त्यांना झुंज जिंकतील अशी शक्ती त्यांना देण्यासाठी सांगीतले. एक महिन्यानंतर त्या कोंबड्या राजाने परत आणल्या आणि ज्या मैदानावर ही झुंज होणार होती आणि जिथे इतर कोंबड्याही आल्या होत्या तिथे त्यांना नेले. कोंबड्यांची झुंज सुरू झाली, या दोन कोंबड्यांवर इतर कोंबडे चालून आले पण हे दोन कोंबडे थंडपणे, शांतपणे आरामातं स्वस्थ बसले; कितीही हल्ला झाला तरी हे दोघे त्याला गंमत समजूनच उभे राहिले; शेवटी सर्व कोंबडे दमून-भागून मैदान सोडून पळाले आणि या दोन कोंबड्यानी ती झुंज जिंकली. यांतून हे तात्पर्य समजून घेतलं पाहिजे की जो अनासक्त असतो त्याच्यावर कधीच हल्ला होत नाही. आपल्या अनेक आसक्तींबरोबर आपण गुंतुन राहतो आणि त्यामधूनच आपले सर्व प्रश्न निर्माण होतात. प्रथम आपलं कुटुंब, मग देश, मग धर्म, जाती इ. तऱ्हेतऱ्हेच्या बंधनातच राहिल्याने तुम्ही अशक्त, कमजोर होता कारण याच गोष्टी सतत



(पुढील मजकूर पान क्र. १८ वर)

## मुखपृष्टाचा पुढील मजकूर ....

तुमच्यावर थैमान घालतात आणि मग सहजयोगी असूनही भ्रमात पडता. म्हणून तुम्हाला सहजयोगबद्दल, तुमच्या स्वतःबद्दल असा दृढ विश्वास हवा की आपण योग्य मार्गावर आहोत, कुणीही तुम्हाला त्रास दिला तरी तुमचं नेहमीच रक्षण होणार आहे, दैवी शक्तीकडून तुम्हाला पूर्ण सुरक्षितता मिळणार आहे याची सदैव खात्री वाटेल.

कुठल्याही धर्माचे, गुरु-पंथाचे किंवा इतर अनुयायी लोक बघा, त्यांना सदैव दुसऱ्या लोकांच्या आक्रमणाची भिती वाटत असते ज्यामुळे आपल्या पध्दतीबद्दल बोलायला ते बिचकतात. काय बोलायचं हेही तारतम्य त्यांच्याजवळ नसते. आपण आत्माच आहोत हे एकदा मनावर बिंबलं की तुम्ही जे काही करतां त्यावर तुमचा ठाम विश्वास असतो याचं तुमचं तुम्हांलाच नवल वाटेल. आणि म्हणूनच आपल्याला याचा फायदा पण आहे की आपण सामूहिकतेत आहोत असंही म्हणता येईल. सामुहिकतेमधे आपली वागणूक कशी आहे हेही तुम्हाला समजून येईल. सामूहिकतेवर याचा काय परिणाम होत आहे ? सामूहिकतेत जो सूक्ष्मात असतो त्याला काही बोलायची जरूर नसते, काही म्हणायची जरूर नसते. वरील गोष्टीप्रमाणे त्या कोंबड्यां सारखा नुसता बघत राहू शकतो. पण त्याची गहनता इतरांना स्पर्श करून राहते. अशा माणसाची योग्यता पाहूनच तुम्हाला समजेल की त्याची गहनता इतकी आहे की तो आक्रमकता दाखवूच शकत नाही, आपल्या आपणच तो आपल्या सुरक्षिततेबद्दल निःशंक असतो. ही सुरक्षितता आपण भावनेतून नव्हे तर आतूनच समजली पाहिजे. एकदा ती प्रगल्भता व जाणीव आली की कुणीही तुमच्यावर हल्ला करू शकणार नाही. चालून येणारा माणूस स्वतःच असुरक्षित असतो, त्याच्यावर वाईट संस्कार असतील किंवा तो सहजयोगी असेल. म्हणून त्या व्यक्तीबद्दल तुमचा दृष्टिकोन उदार असावा.

सगळ्यांना माहित आहे की सदाशीव सर्वांना क्षमा करणारे आहेत. कुणालाही अगदी एका पायावर उभे राहून वा डोक्यावर उभे राहून वा उपवास करून किंवा आणखी कसल्याही प्रकारे प्रायश्चित करणारे पण. या प्रकारांनी ते अगदी वैतागून जातात व म्हणतात की 'ठीक आहे, तुला काय पाहिजे ते मी देतो'. अगदी राक्षसांनाही, त्यांनी प्रायश्चित वा तप केल्यावर त्यांनी वर दिले. कारण त्यांच्या पायश्चित्ताला ते कंटाळले.

सदाशिवांनी वर दिलेल्या पुष्कळ कथा आहेत. रावणाला पण मिळाला. रावणानें काय काय तप केलं त्याच्या मजेदार कथा आहेत. दहा तोंडे असूनही तो इतके उपास कसा करू शकला मला समजत नाही. अगदी शिवसुध्दां वैतागून जातील इतकी उग्र तपश्चर्या त्याने केली. त्यांची करुणाच इतकी महान आहे की तेच म्हणाले असतील की याला काय पाहिजेल ते देऊ या. शिवाकडे आल्यावर ते त्याला म्हणाले 'तूं हे काय चालवलं आहेस ? तुला काय पाहिजे ?'. तर रावण म्हणाला "मला वर द्या" कसला वर विचारल्यावर तो म्हणाला "मी जे मागेन ते देईन असं आधी कबूल करा". तर ते म्हणाले "मला ते शक्य असेल तर नक्कीच देईन". ही फार मजेदार गोष्ट आहे. मग रावण म्हणाला "मला तुमची पत्नी हवी" कारण त्याला माहीत होते की शिवांची पत्नी म्हणजे आदीशक्ति. आणि ती भागीदार झाल्यावर काहीही अशक्य नाही. म्हणून तो म्हणाला "तुमची पत्नी मला माझी जोडीदारीण म्हणून हवी'. आता या राक्षसाला एवढा मोठा वर द्यायचा म्हणजे सदाशिवांना पंचाईतच आली, तरी करुणामय असल्याने त्यांनी ते मानलं. या कथेतील तात्पर्य एवढेच की त्यांच्या करुणेमधून सर्व काही कार्यान्वित होते. मग सदाशिवांची पत्नी पार्वती हिने त्या भयंकर राक्षसाबरोबर जावे असं ठरलं. पार्वतीचा भाऊ म्हणजे श्री विष्णु, अर्थात श्रीकृष्ण, तो मनांत म्हणाला की माझ्या बहिणीला या सैतानाबरोबर जाऊ देणार नाही, मला काहीतरी केलंच पाहिजे. श्रीकृष्ण फारच चतुर म्हणून त्याने रावणाला बाथरुमला जावंसं वाटावं अशी युक्ति केली. लाजेखातर-रावणाने पार्वतीला उतरवून खाली ठेवलं आणि तो बाथरुमला गेला. शिवांनी तर रावणाला आधीच बजावून ठेवलं होते की भूमाता ही पार्वतीची आई असल्यामुळे तिला जमिनीवर ठेवायचं नाही, व तिला पूर्ण वेळ खांद्यावर बसवून न्यायचं. पार्वतीला खाली उभे केल्याबरोबर भूमातेने तिला आपल्यामधे ओढून घेतले; रावणाला काय करावं सुचेना. म्हणून तो पुन्हां शिवाकडे आला व म्हणाला "तुम्ही मला वचन दिलं आणि आता हे काय झालं ?" ते म्हणाले "मी तुला आधीच बजावलं होते की तिचा भाऊ फार खोडकर आहे आणि तो काही तरी युक्ती करेल म्हणून तुला जपून रहायला हवं. आता पुन्हा तिला कुठल्याही प्रसंगी जमिनीवर ठेऊ नकोस".

त्याने पुन्हा तिला खांद्यावर घेतलं, एकदम त्याला आपल्याकडे पाहून हसणारा एक लहान मुलगा - जो श्रीकृष्णच होता - दिसला. तो म्हणाला "माझ्याकडे पाहून असा हसतोस कशाला ?" मुलगा म्हणाला "वा वा, या म्हातारीला कशाला खांद्यावर घेऊन चालला आहेस ? तिच्या अंगावर काहीच दागीने दिसत नाही". ही देवता आहे असं सांगितल्यावर मुलगा म्हणाला "शक्यच नाही, हिच्या अंगावर दागीने नाहीत, भरजरी वस्त्रे नाहीत, ही कसली देवता ?" बघितलं तर दात पडलेली एक म्हातारी बसलेली आणि आपल्याला हसत असलेली; त्याबरोबर घाबरून त्याने तिला टाकून दिले. हीच महामाया !

तिसऱ्या वेळी पुन्हा येऊन त्याने शिवाला सांगितले की तुझ्या पत्नीला कुणाचंही काही ऐकूं नकोस असं सांग आणि तिला बऱ्या बोलाने माझ्याबरोबर पाठव. शिवांनी सांगितले की ठीक

आहे. ती लंकेत जन्म घेईल आणि तिच्यावरोबर तू विवाह कर. तिचं नांव मंदोदरी असेल. ही कथा अशीच पुढे चालते. मंदोदरी श्री विष्णूची भक्त होती; पुढे श्रीराम रावणाचा वध करायला आले वगैरे सर्व मंदोदरीनेच जमवलं.कारण तिला माहीत होतं की श्रीरामच रावणाला त्याच्या स्त्रीलंपटपणापासून मुक्त करतील. ज्यामुळे तो सीतेच्या मागे लागला होता आणि असेच उद्योग करत होता. खरंतर तिची इच्छा होती की काहीतरी घडून रावणाला पुनर्जन्म मिळावा आणि सुंदर स्त्रियांच्या मागे लागण्याची त्याची प्रवृत्ती दूर व्हावी. त्याने सीतेला पळवून लंकेत आणून ठेवल्याचं तिला अजिबात आवडलं नव्हते, पण रावण ऐकायलाच तयार नव्हता. म्हणून मग मोठे युध्द झाले आणि रामांकडून तो मारला गेला.

हे सर्व शिवांच्या अपार करुणेमधून घडून आले. त्यांची ही करुणा कधी कधी विचित्र वाटते पण त्याच्यामागे फार मोठं तत्व आहे. ते जे काही करतात त्याच्यामधून कुठला तरी प्रश्न सुटत असतो. उदा.एका युध्दामध्ये असाच एक मोठा प्रश्न निर्माण झाला होता जो एका भयंकर राक्षसामुळे, ज्याला शिवांकडून अमरपणाचं वरदान मिळालं होते त्याच्यामुळे. तसंच एका संताला पण वरदान मिळालं होते आणि त्याची झोपायची वेळ झाल्यामुळे कुणीही आपल्याला त्रास देऊन जागे न करण्याविषयी त्याने सांगितले. त्याला असं वरदान मिळालं होते की त्याची झोपमोड करणाऱ्याकडे त्याने नुसती नजर टाकली तर ती व्यक्ति भस्मसात होईल. युध्द चालू झाल्यावर श्रीकृष्णाला असा उत्तम उपाय सुचला की या अमर राक्षसाला या वरदान मिळालेल्या साधूकडूनच मारून टाकलेलं बरं. त्याने युक्ति केली, तो रणांगणातून पळून चालायला लागला, म्हणून त्याला रणछोडदास नांवही पडलं. पळून जातांना त्याने अंगावर शाल घेतली होती आणि हळूच एका गुहेमधे, जिथे तो साधु झोपला होता, त्याच्या अंगावर टाकली. त्याच्या पाठोपाठ आलेल्या त्या राक्षसाने मग्ती शाल पाहिली आणि म्हणाला "म्हणजे तू आता दमून झोपला आहेस तर मी चांगला समाचार घेतो". शाल पांघरून कोण झोपला आहे याची पर्वा न करतां त्याने शाल ओढली, झोपलेला तो साधु जागा झाला आणि त्याने तिसरा डोळा उघडून त्या राक्षसाला भस्मसात केलं. अशा तऱ्हेने प्रश्न सुटला.

ही सगळी लीला अशी चालते ज्यामधे तीन शक्त्या कार्य करत असतात आणि सरतेशेवटी सत्याचा विजय होतो. पहिली श्री शिवाची करुणा आणि सौजन्य एका बाजूला; दुसरीकडे श्रीकृष्णाची म्हणजेच श्रीविष्णूची तिला सावरून घेणे, तिसरी ब्रम्हशक्ती जी सर्व काही निर्माण करत असते व पैदा करत असते. या तिन्ही शक्तींचे कार्य अशा रितीने चालते की त्या वातावरणामधून आपल्याला वाटावं की मानवी चेतनेसाठी आणखी काही करायला पाहिजे.

शिव हे एका बाजूला अत्यंत करुणामय आहेत, असुर वा राक्षस यांच्यावरही ते दया करतात, पण दुसऱ्या बाजूने ते तितकेच कठोर आहेत. जर लोक अगदी रसातळाला गेले, जर त्यांनी अध्यात्मिक उन्नतीकडे दुर्लक्ष केले, त्यांची निरागसता पूर्णपणे नष्ट झाली, जगांत नाना तऱ्हेचे प्रश्न निर्माण करणाऱ्या भौतिक उपभोगापासून जर ते दूर राहिले नाहीत तर शिव सर्व सृष्टीचा नाश करतील. आदिशक्तीच्या कार्याचे ते साक्षी आहेत. सर्व कार्य करायला, मानवांची निर्मिती, मानवांच कुंडलिनी-जागरण वगैरे सर्व कार्य करायला आदिशक्तीला त्यांनी मुभा दिली आहे. पण जर लोक, ज्यांना तिने मुलांसारखं सांभाळलं, वाईट वागू लागले, तिच्या कार्याचा अपमान होईल किंवा त्यामधे अडथळे आणून विघाड माजवू लागले तर त्यांचा राग अनावर होऊन ते सर्व सृष्टीचाच नाश करू शकतील. आतां त्यांना ते करायची वेळ येणार नाही असं मला वाटतं कारण आतां सगळीकडे सहजयोगी झाले आहेत. पण सहजयोग्यांमध्ये मला जे दिसतं ते असं की काही सहजयोगी लवकर प्रगल्भ होतात, हळूं हळूं पण दृढपणे त्यांचे शिवतत्त्व प्रप्रस्थापित होते. त्याची पहिली खूण म्हणजे ते अंतःकरणापासुन अनासक्त बनूं लागतात. ही अनासक्ती मानसिक नसते. हे म्हणजे सर्व घरदार सोडून हिमालयांत जायचे वा संन्यास घ्यायचा असला प्रकार नव्हे; पण ती अंगभूत स्वभाव बनते. ही अलिप्तता कार्यान्वित झाली की पहिली गोष्ट म्हणजे आपण आनंदी होतो, समाधानी होतो. आतां तुम्ही कोणाही दुःखी माणसाला विचारलं की तुम्हाला काय दुःख आहे तर तो आपली पत्नी, मुले, घर, देश, समाज वगैरे - वगैरेबद्दल सांगत बसेल; अवतीभवतीच्या वा त्रासदायक घटनांमुळे तो फार त्रस्त व असमाधानी असतो. पण आता आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर असं दुःख करीत असण्याचा काही फायदा नाही. आता कशाची जरूर असेल तर हे समजण्याची की इतर लोकांमधे पण असंच परिवर्तन करण्यास व त्यायोगे कुटुंबातील, समाजातील वा देशांतील अशांत परिस्थिती सुधारण्यास तुम्ही योग्य झाला आहात. नुसती टीका करून किंवा वाईट वाटून चालणार नाही. पण हे सर्व करीत असताना मुख्य गोष्ट म्हणजे तुम्ही स्वतः अलिप्त राहिले पाहिजे.

सुरवातीला जेव्हां मी सहजयोग सांगायला लागले तेव्हां लोकांनी आपल्या देशाबद्दल, धर्माबद्दल जे काही ते चुकीचे समजत होते वा करत होते. त्याबद्दल सांगीतल्यावर मला आश्चर्यच वाटले. त्यांनी सांगीतल्यापैकी बरंचस मला माहीत नव्हते आणि मला वाटलं की हीच त्यांची अलिप्तता आहे ज्यामुळे त्यांना आपल्या नातेवाईकांत, समाजात, देशांत व सर्व जगांत काय काय चुकीचं चाललं आहे ते समजू लागले होते. जेव्हां तुम्ही

कोणत्याही गोष्टीचा अलिप्त राहून विचार करात तेव्हांच हे शक्य होते ; एरवी हे दोष आपल्याला कधीच उमजत नाहीत, दुसऱ्या माणसाचं काय चुकतं हे पण समजत नाही. एवढंच काय पण कुठल्या चक्रावर पकड येत आहे हे सुध्दा समजत नाही. म्हणून प्रथम ही अलिप्तता आली पाहिजे. आतां ही अलिप्तता कशी मिळवायची हे बघू. पुष्कळ लोक विचारतात की माताजी ही अलिप्तता कशी मिळवायची ? तर मी कशातही गुंतलेली नसते म्हणून मी आधीच अलिप्त होते. हे कसं करायचं मला माहीत नाही. पण तुम्हाला हे मिळवण्याकरतां आत्मपरीक्षण केले पाहिजे. आपण कशात अडकलोय हे शोधण्याचा प्रयत्न करा. मी का दुःखी आहे, कुणासाठी मी काळजी करतोय, मला कां काळजी वाटते ?

काही गोष्टी अशा असतात की त्याला काही महत्व नसते पण काही सहजयोगी त्यांतच खुप लक्ष घालतात. उदा. पाश्चात्य लोक आपल्या मुलांची तितकी काळजी घेत नाहीत असं मला सांगीतले गेले. पण जागृती मिळाल्यावरोबर ते मुलांमध्ये अगदी चिकटल्यासारखे गुंतून जातात ; त्या मुलांच्या कल्याणासाठी खर काय करायला हवं याचा विचार ते करू शकत नाही. ते समजतात की मुलांचच सगळं करणं हे त्यांचे प्रथम कर्तव्य आहे. मुलांना कुठे ठेवायचं वगैरेसारख्या गोष्टीतच त्यांचे सारं चित्त अडकून जाते. अलिप्तता ही आतून वाटायला पाहिजे, जबरदस्तीने ती निर्माण करतां येणार नाही. पण ध्यानामधून तुमच्या आतून ती दृढ करता येते आणि ती स्थिती आनंद-दायक असते.

तुम्ही जेव्हां पवित्र आत्मा बनता त्यावेळी तुम्ही अलिप्त होऊन जाता कारण तुम्ही फक्त परमात्म्याचे प्रतिबिंब झालेले असतां. त्या स्थितीत तुमची सर्व बंधने गळून जातात. कोणी म्हणेल असं कसं ? हा प्रपंच कसा संपेल ? तर प्रथम ध्यान. तुम्ही स्वतःबद्दल, स्वतःचा काय चुकतंय, कुठल्या बाजूवर पक्कड आहे डावी की उजवी ? याचा शोध घेत राहता. ध्यानातून हे सर्व समजतें. तुम्हाला पैसा, धंदा, कुटुंब, देश इ. गोष्टीमधे, ज्या 'सहज' नाहीत, अडकलेले आहांत का ? तुमचं वागणं-चालणं अ-सहज तर नाही नां ? ध्यानातूनच या बंधनापासून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करा. डवी व उजवी बाजू कशी सोडवायची तुम्हाला माहीत आहे. ही सारी स्थिती तुम्हाला हातांच्या बोटांवर जाणवेल, त्यातून कुठल्या चक्रावर पक्कड आहे ते समजेल आणि तुम्हाला कसला त्रास आहे हे पण कळेल. सहजयोगाच्या सोप्या पध्दतीने तुम्ही त्यात सुधारणा करू शकाल. अडचण हीच आहे की एकदा आपण एखाद्या गोष्टीत अडकलो की आपण बांधले गेलो आहोत हा साधा विचारही आपल्या मनांत येत नाही, आपल्याला वाटतं आपण फार मोठं काम करतो आहोत, म्हणजे आपलं याच्यावर प्रेम आहे. त्याच्यावर प्रेम आहे वगैरे. कुठल्याही तऱ्हेची अशा बंधनांमधून आलेली करुणा ही करुणा नव्हेच ; लोकांना उगीच वाटतं की शिव-तत्व आपल्यामधे कार्यान्वित झालं आहे पण तसं मुळीच नसते. श्री शिवांची करुणा तुम्ही मिळवू शकत नाही ; कारण ती करुणा अगदी शुध्द असते. जणुं वृक्षातील जीवनसत्व जे वर चढत वृक्षाच्या सर्व भागात पोचते आणि नंतर विरून जाते किंवा धरणीमातेमध्ये परत येते. त्याला कुठल्याही भागाशी दुसरं काम नसते. ते जर झाडाच्या एकाच फुलाला, पानाला किंवा फळाला गेले तर सबंध झाडच मरून जाईल आणि फुलं पण नाहीशी होतील. म्हणून एखाद्या विशिष्ट कल्पना किंवा वस्तूंच आकर्षण वा बंधन बरोबर नाही.

सहजयोगातील लोक जमवून घेतात आणि काय करायचं ते त्यांना बरोबर समजतं, पण मुख्य गोष्ट म्हणजे ध्यान. हृदयापासून तुम्ही शिवतत्वावर ध्यान केल्यावर कसलीच आसक्ति राहणार नाही आणि त्या ध्यानांत पुरेपूर आनंद मिळतो. लोकांना खाणे-पिणे, कपडे-लत्ते, घर याबद्दल आवड असते पण त्या आवडीमधे प्रकाश आलेला असतो आणि मग त्या गोष्टींना तुम्ही चिकटून जात नाही.

पाश्चात्य देशांत लोक नको त्या गोष्टीच्या मागे धावत असतात. त्यांच्या व्यक्तिमत्वामधे प्रगल्भता आलेली नसल्यामुळे निव्वळ फॅशन म्हणून ते काही गोष्टी करत असतात. तुम्ही प्रगल्भ व्यक्ती झाल्यावर प्रत्येक गोष्टीकडे इतरांच्यापेक्षा एका वरच्या दृष्टीकोनातून तुम्ही बघता आणि दुसऱ्याच्या विचारात विरघळून जात नाही. तुम्हाला जे मिळालेलं असते ते इतरांपेक्षा जास्त मूल्यवान, उन्नतम व आनंद-दायक असते.

लोकांना वाटतं की आवडी-निवडीतून आपल्याला समाधान मिळेल. बायको मिळाली, मुलगा झाला आणि सुख-सोयी मिळाल्या की समाधान मिळेल असं वाटतं, ही तर चुकीची समजूत आहे. आनंदाचा स्त्रोत तुमच्यामधेच आहे अर्थात तो म्हणजे आत्मा. तुमचा पति चांगला आहे कां, मुलं चांगली आहेत का वाईट, ते सर्व कसेही असले तरी ते तुम्हाला आनंद देऊ शकत नाही. तुम्ही तुमचाच आनंद उपभोगू शकतां आणि त्यातूनच तुमच्यात क्षमाशीलता येते. जर कोणीच तुमचं काही बरं - वाईट करू शकत नाही तर तुम्ही रागावणार तरी कोणावर ? अपार क्षमा हीच सदाशिवांची फार महान शक्ती (गुण) आहे. ते एका सिमेपर्यंत क्षमा करतात पण त्याच्या पलीकडे आदिशक्तीचे सर्व विश्व जाळून टाकतात. एरवी ते फार क्षमाशील आहेत आणि त्याबरोबरच फार संतुलित आहेत.

एकदां आदिशक्तीला सर्वत्र अवनती माजल्यामुळे साऱ्या जगाचा राग आला आणि तिने सगळ्यांचा नाश सुरु केला. म्हणून

एका लहान बालकाला तिच्या पायाखाली ठेवलं ; तेव्हां धावरून जाऊन तीने भलीमोठी जीभ बाहेर काढली आणि आदिशक्तीने विध्वंस बंद केला. त्यांची पध्दत अशी आहे की ज्यांना शिव-तत्व जागृत करायचं आहे ते लोक प्रथम खुप क्षमाशील झाले पाहिजेत. काही लोक फार क्रूर व छळ करणारे असतात ; काही सहन झालं नाही तर नाहींस करा. मी त्याबद्दल तुम्हाला दोष देणार नाही पण जमत असेल तर ते सहन करण्याचा अनुभव घ्या. सहन करणे हे त्यापासुन दूर जाण्यापेक्षा चांगलं. जसं एकदा एक महिला माझ्याकडे येऊन म्हणाली की "मी नवऱ्यापासून घटस्फोट घेणार आहे" का म्हणून असं मी विचारले तर म्हणाली की " तो फार उशीरा घरी येतो, त्यामुळे मला त्याचा सहवास फार थोडा मिळतो". मग मी म्हणाले "घटस्फोट घेतल्यावर तर तुला तो अजिबातच मिळणार नाही, तर हे काय कारण आहे ? आत्ता थोडाफार का होईनां, वेळ मिळेल तेव्हां तो आहेच,. घटस्फोट घेतल्यावर मुळीच मिळणार नाही.". म्हणजे घटस्फोट हा काही उपाय नाही मग अशा घटस्फोटाचा काय फायदा ? म्हणजे अशा तऱ्हेच्या अनेक गोष्टी अलिप्त झाल्यावर, कसल्याही गोष्टीची आसक्ती संपल्यावर समजू लागतात. शिवाय तुम्ही सर्वांपासून अलिप्त बनल्यावर कोण तुमच्यावर हुकूमत गाजवणार आहे ? कुणीच नाही. तरी जेव्हां जरूर आहे असं तुम्हाला वाटेल त्यावेळी तुम्ही विरोध केला पाहिजे. तोसुध्दा अलिप्तता राखून. विरोध करतांनासुध्दा पूर्ण अलिप्तता राखूनच करायला पाहिजे.

आज आपल्यापुढचा प्रश्न याहून वेगळा आहे, तो म्हणजे आपण सगळ्यांनी उन्नत व्हायचे आहे आणि तेही एकसारखेपणाने. जाळ्यांत अडकलेल्या पक्षांची एक गोष्ट आहे. त्या पक्षांनी जाळ्यांतून बाहेर पडायचं ठरवलं आणि सगळे धडपड करायला लागले. प्रत्येकाने खुप प्रयत्न केला पण कुणालाच ते जमेना. म्हणून त्यांनी एकत्रित उडायचं ठरवलं, एक-दोन-तीन म्हटल्याप्रमाणे सगळे उडाले आणि जाळ्यासकट आकाशांत आले. मग त्यांनी उंदरांना बोलावून सगळं जाळं तोडून घेतले आणि अशी सर्वांची सुटका झाली. उंदीर आणि पक्षी जर हे करू शकतात तर आपल्याला का नाही जमणार ? सामूहिकतेमधे आल्यावर आपण एकमेकांना कशी मदत करतो व आनंद मिळवतो हे पाहून तुम्हाला आश्चर्य वाटेल. आता तुमच्या आईला, वडिलांना,. बहिणीला कसला त्रास असला तरी हरकत नाही. आता तुम्ही आनंदाच्या सागरांत आला आहांत आणि या सामूहिकतेतूनच तुमचे प्रश्न सुटणार आहेत. तुमचे प्रश्न जर सोडवायचे असतील तर तुम्हाला सामूहिकतेतूनच यायला हवं, सामूहिकतेतच मिसळून जायला हवं. सहजयोगाच्या सागरांत एकदां उतरलात की तो आनंदच तुम्हाला खेचून घेईल, एकमेकांना भेटण्याचा आनंद तुम्हाला कळेल. पुष्कळ सहजयोग्यांनी मला सांगीतलं आहे की परक्या ठिकाणी अचानक एखादा सहजयोगी भेटतो आणि त्यांचा खुप आनंद मिळतो. सहजयोग्यांमधील हे बंधन फार आनंद देणारं आहे आणि त्या आनंदतंतूनेच आपण एकमेकांशी जोडले गेलो आहोत. म्हणूनच तुम्ही एकमेकांपासुन आनंद मिळवता.

भारतातील एक महान संत नामदेव यांची एक गोष्ट मी तुम्हाला सांगीतली होती. ते शिंपी होते. तसाच आणखी एक कुंभार होता, तो पण नामदेवांसारखा कवी होता व त्यांचं नांव होते गोरा कुंभार. एका संताला दुसऱ्या संतभेटीची ओढ असते ; तसा नामदेव गोराकुंभाराला भेटायला गेला ; त्याच्याकडे बघितल्यावर एकदम तो स्तब्ध झाला आणि त्याच्या तोंडातून सुंदर अभंग निघाला - मी चैतन्य बघायला आलो आणि इथे तर चैतन्यानेच आकार घेतला आहे (निर्गुणाचे भेटी आलो सगुणाशी). मी निराकार बघायला, चैतन्य बघायला आलो पण त्या चैतन्यानेच माझ्या समोर हा आकार घेतलेला मला दिसतो आहे. एक संतच दुसऱ्या संताबद्दल असं म्हणू शकतो. हे सूक्ष्म आकर्षण व स्तुती संतामधेच असू शकते. नामदेवांना तो मळलेले कपडे घालून माती तुडवीत आहे वगैरे दिसलंच नाही ; दिसलं ते फक्त चैतन्याने धारण केलेला आकार.

सहजयोग्यामध्ये एकमेकांबद्दलच्या भावनेची संवेदनक्षमता वृध्दिंगत झाली पाहिजे. मग तुम्हाला इतर फालतू वरवरच्या गोष्टींची पर्वा उरणार नाही आणि हाच शिवतत्त्वाचा आणखी एक महत्वाचा भाग आहे. त्यांना कसली पर्वा नाही ; त्यांच्या केसांच्या जटा झाल्या आहेत, लग्नाला जातांनासुध्दा ते त्यांच्या जळदगतीच्या बैलावर आरामांत बसून जातात. तुम्हाला कल्पना येणार नाही, त्यांच्या मित्र व शिष्यांपैकी कुणाला एकच डोळा आहे, कुणाला एकच हात आहे, कुणी फार वाकलेला आहे पण या बाहेरच्या गोष्टींची त्यांना फिकीर नाही. तुम्हाला एक हात आहे वा तुमचं शरीर वाकडं-तिकडं आहे वगैरे गोष्टींचा त्यांना फरक नाही. कारण त्यांच्या बाजूने ते सर्वांना आपला समजतात ; व्यक्तीचा वरवरचा चेहरा-मोहरा, आकार वगैरेकडे त्यांचं लक्ष नसते, त्यांच्यातील दैवी प्रभा ते बघतात.

हे तत्त्व समजून घेण्याच्या अनेक तऱ्हा आपल्याला अवगत आहेत कारण ते सर्वव्यापी आहेत. तुम्हाला कोणाबद्दलही अनुकंपा वाटली तर ती कार्यान्वित होते. मेक्सिकोमध्ये नुकतीच एक असाधारण रोग झालेल्या माणसाची घटना घडली. यू. नो. मधे काम करणाऱ्या एका मेक्सिकन महिलेची ही घटना. तिने मला दोन पत्र पाठवून कळवलं की तिचा मुलगा असाधारण रोगाने मरायला टेकला आहे. ते वाचून माझे डोळे भरून आले आणि करुणेने माझं हृदय भरून आले. तुम्हाला आश्चर्य वाटेल की त्या करुणेच्या माध्यमातून तो मुलगा बरा झाला. मग तिने मला पुन्हा पत्र

पाठवून माझे आभार मानले. माझी करुणा मानसिक नसल्यामुळे मला आश्चर्य वाटले. ती असते, तिचा अविष्कार होतो आणि कार्य घडून येते. तुम्हीसुध्दा तसे होऊ शकता. तुम्हाला माझ्या सर्व शक्त्या मिळाव्या हीच माझी इच्छा आहे. पण प्रथम ही करुणा. सहजयोगी दुसऱ्याशी वाईट वागत नाही, वागू शकत नाही, दुसरा मनुष्य सहजयोगी असो वा नसो त्याला महत्व नाही. सहजयोग्याने कधी आक्रमक बनू नये. ते सहजयोग्याला शोभत नाही. सहजयोगी वेगळा असतो. परवां मी एकाला म्हटलं की तू फार तापट आहेस. तो म्हणाला "हो मी तापट आहे पण जेव्हा कोणी मला भडकवतो तेव्हां". मी म्हटले की चिडवल्यावर कुणालाही राग येणारच. चिडवल्यावर रागावणं म्हणजे काही मोठेपणाचं लक्षण नव्हे. पण चिडवल्यावरही ज्याला राग येत नाही ती स्थिती वेगळीच आहे.

आजकाल या आधुनिक गणल्या जाणाऱ्या काळी जगात वातावरण असं आहे की सगळीकडे संघर्ष चालू आहे. हा शिवांचा गुण नाही. शिवांच तत्व म्हणजे 'सहज' तत्व, तुम्ही सहजयोगी असाल तर तुमच्यामधे करुणा असलीच पाहिजे, दुसऱ्यांना भावना तुम्ही समजावून घेतल्या पाहिजेत आणि त्यांना मदत करायला तुम्ही तत्पर असले पाहिजे. दुसऱ्यांना म्हणजे सहजयोग्यांनाच नव्हे तर जे सहजयोगी नाहीत त्यांना पण, मगच तुमच्यातील करुणा कार्यशाली होईल. आजकालच्या संस्कृतीचा सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे ही पाश्चात्य संस्कृती अधोगतीकडे चालली आहे. वर्तमानपत्र उघडल्याबरोबर ज्या बातम्या नजरेस पडतात त्या धक्कादायक असतात. तसल्या लोकांपैकी किती जणांना यात नाश होण्यापूर्वी त्यांची चूक उमजणार आहे मला कळत नाही. खरोखरच हे सर्व स्वतःला घातक आहे. एका बाजूने हा सर्व स्वार्थीपणा आहे आणि समाजामध्ये स्वैर वृत्ती बोकाळत आहे. दुसऱ्या बाजूने इस्लाम धर्मीयांचा याला विरोध आहे, पण या विरोध करण्याच्या प्रकारांतून आणखीनच प्रश्न उभे रहात आहेत. तुम्ही जेव्हां एखाद्याला हे करू नको ते करू नको असं सांगता तेव्हां तो माणूस नेमकं तसंच करायला बघतो. जिथे इस्लाम संस्कृतीचा पगडा आहे अशा उत्तर भागातील प्रदेशात तुम्ही गेलात तर तिथे कडक नितीनियम चाललेले दिसतील, ते लोक, सगळे नाही तरी पुष्कळ जण सारखे बायकांकडेच बघत बसतात, तिथल्या हिंदूंनासुध्दा त्यांच्या वाईट सवयी लागल्या आहेत कारण तेही मुस्लिम दबावाखाली जगले. स्त्री जेव्हां कुणाला दिसू नये असे कपडे घालते तेव्हां त्यांची उत्सुकता वाढतेच. माझ्याबरोबर प्रवासांत एक गृहस्थ रस्त्यावरच्या एकुण एक स्त्रियांकडे मान झुकवून पहात होते, म्हणून मी म्हटलं "इतकं मान फिरवून-फिरवून तुमची मान मोडेल, पण ही सर्वसाधारणच गोष्ट आहे. एवढंच नाही तर या सवयीसाठी लोक फार अनितीमान बनतात, पाश्चात्य देशाप्रमाणे, तुमच्या वासना फार दाबून ठेवणंही चुकीचं आहे. तसंच वासना या बाहेरून दबावाखाली आणल्या तरी माणूस तितकाच जास्त अनितीमान होतो. दबावामधून निर्माण झालेलं आकर्षण ठीक वा सुसंस्कृत नसते.

सहजयोगामधे कसल्याच तऱ्हेचे दडपण नाही. तुम्ही फक्त निरागस होता. हेच शिवांचं तत्व. सहजसंस्कृतीमध्ये सर्व काही संतुलनात असते, त्यामध्ये कडक नितीनियम नाहीत किंवा कसलाही नियंत्रण नाही तर फक्त मधोमध असणे महत्वाचं आणि हेच शिवांचे महान तत्व. अबोधिता तुमच्या व्यक्तिमत्वातून प्रकाशमान होते. तुम्ही सर्व लोक, पूर्वी कसेही असलात तरी आता शुध्द झाले आहांत हे मला दिसत आहे. तुमच्या स्वभावात पाश्चिमात्य लोकांसारखा विचित्रपणा आतां राहिला नाही. बरेचसे इस्लाम धर्माचे लोक पण सहजयोगात आल्यावर खऱ्या अर्थाने 'सहज' झाले व आतां चांगलं आयुष्य चालवित आहेत. काही इराणी लोकांनी पण सहजयोग घेतल्यानंतर मला पत्र पाठवून पूर्वीच्या साऱ्या चुका कबूल केल्या आहेत., मला त्यांचं फार आश्चर्य वाटलं व धक्काच बसला. मी ती पत्रं वाचलीच नाहीत कारण माझ्या दृष्टीने ते फारच होते. पण आतां तेच सगळ्यांत सुसंस्कृत झाले असल्याचं मला दिसत आहे. एका टोकाला जाणं जसं चूक आहे तसंच दुसऱ्या टोकाला जाणंही तितकंच चूक. पण 'सहज' मधे मधोमध राहणं म्हणजे जीवनातील सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे नितीमत्ता होय हे उमजणं आणि तोच सगळ्यांत सोपा मार्ग आहे. ही जाण तुमच्या अबोधितेमधून निर्माण होते. हा श्रीगणेशांचा, जे शिवाचे पुत्र आहेत, मोठा गुण आहे. आणि तो शिवांच्या अबोधितेपासून प्रकाशित होत असतो. म्हणून मुलांबद्दलच आसक्ती बाळगून रहाल तर तुम्ही अयोग्य गोष्टी करत बसाल. हे तुमच्यासाठी ठीक नाही. अशी ही नवीन आसक्ती सहजयोगांत आल्यावर सुरु झालेले लोक मी पाहिले आहेत आणि अशी बरीच उदाहरणं आहेत.

तुम्ही लोकांनी आश्रमातही सामूहिक ध्यान करावं असं माझं म्हणणं आहे. तसं केलं तर ती एक फार चांगली गोष्ट होईल. पण तुम्ही कोणाला चैतन्य-लहरी द्यायची जरूरी नाही; दुसऱ्यांची चक्र तपासण्याची जरूर नाही. तुम्ही फक्त स्वतःची काळजी घ्या, स्वतःचं कुठं चुकतं आहे ते बघा. तुमच्या उन्नतीसाठी जे उपाय आहेत ते करा कारण सहजयोग्यांवरच आता साऱ्या जगाची जबाबदारी आहे. हे तुम्ही पक्कं लक्षात घ्या, सहजयोगाशिवाय आता दुसरा उपायच नाही. मनुष्यजातीला सर्व समस्यांमधून सोडवण्यासाठीच या पृथ्वीवर सहजयोग अवतरला आहे. म्हणून तुम्हां सर्व सहजयोग्यांची हीच जबाबदारी आहे की शब्दजंजाल व आक्रमकता याच्या मागे न लागता तुम्ही स्वतःला आदर्श बनता, त्याकरतां प्रेम आणि करुणेचा मार्ग स्विकारा.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.



(सहजयोगी सभासदांसाठी विनामूल्य)